म. ग्रं. सं. वाच.

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.

विषय नाटके

दा. क्र. २०५६२

IRBK-0120562

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. २०५६२ नों. दि.
वि. नाटक क्र.

वाचनालय
नाटक
२०५६२
१८/१०/८४

# ● ● आकाश पेलताना ● ●

अनिल बर्वे यांचे
इतर प्रकाशित साहित्य ...

## कादंबरी

थँक यू मिस्टर ग्लाड
डोंगर म्हातारा झाला
स्टड फार्म
अकरा कोटी गॅलन पाणी

## नाटक

जुलिएटचे डोळे ( अप्रकाशित )
कोलंबस वाट चुकला
थँक यू मिस्टर ग्लाड
हमिदाबाईची कोठी
पुत्रकामेष्टी
मी मलिक या देशाचा ( अप्रकाशित )

## इतर ...

रोखलेल्या बंदुका आणि उठलेली जनता
डु दाओ अन् चर्च वेल्स

# आकाश पेलताना

अनिल बर्वे

●

IRBK-0120562

• पॉप्युलर प्रकाशन •
मुंबई

आकाश पेलताना
पॉप्युलर प्रकाशन
( म – ४४६ )

Akash Peltana
( Marathi Play )
Anil Barve

© अनिल बर्वे

पहिली आवृत्ती १९८४ / १९०६

या नाटकाच्या
प्रयोगाचे सर्व हक्क
लेखकाकडे आहेत.
तालमींना प्रारंभ
करण्यापूर्वी लेखकाची
लेखी अनुमती घेणे
आवश्यक आहे.

पत्रव्यहारासाठी
पत्ता :
अनिल बर्वे
एकवीरा अपार्टमेंटस्
३६९ वीर सावरकर मार्ग
मुंबई ४०० ०२८

---

मुद्रक :
सा. रा. भंडारी
भंडारी मुद्रणालय
२७१ नारायण पेठ
पुणे ४११ ०३०

प्रकाशक :
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन, प्रा. लि.
३५, सी. पं. मालवीय रोड
ताडदेव, मुंबई ४०० ०३४

● ● ● या नाटकाचा पहिला प्रयोग ' माऊली प्रॉडक्शन्स ' मुंबई या व्यावसायिक संस्थेतर्फे दि. ६ ऑगस्ट १९८२ रोजी दुपारी चार वाजता शिवाजी मंदिर, दादर, मुंबई येथे सादर करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| **दिग्दर्शक** | ● | राम मुंगी |
| **नेपथ्य व प्रकाश योजना** | ● | सखाराम भावे |
| **प्रकाश सहाय्यक** | ● | ठाकूर बंधू व परब |
| **पार्श्वसंगीत** | ● | भालचंद्र पेंढारकर |
| **वेषभूषा** | ● | विजय टेलर्स, हरीष कर्देकर |

## ● पात्रयोजना ●

●

| | | |
|---|---|---|
| दाजी साहेब | ● | डॉ. श्रीराम लागू |
| बाप्पाजी | ● | रामनाथ घुरीये |
| जाधवराव | ● | रशीद हश्मी |
| मास्तर | ● | श्रीराम पुजारी |
| इन्स्पेक्टर गावडे | ● | शशिकांत महाडिक |
| सब इन्स्पेक्टर थोरात | ● | रमेशचंद्र थोरात |
| हवालदार | ● | यशवंत कोकीतकर |
| भिक्या | ● | पांडुरंग बेणारे |
| गेन्या | ● | परशुराम देसाई |
| मारत्या | ● | हरीष कर्देकर |
| सावित्री | ● | विजया वैद्य |
| बाबी | ● | मधू कांबीकर |

●

# आकाश पेळताना

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. २०५६२ नों. दि. १८/१०/८७
वि. नाटक क्र.

## अंक पहिला : प्रवेश पहिला

[ पडदा उघडतो त्या वेळी खासदार दाजीसाहेबांची स्टडीरूम दिसू लागते. संपूर्ण स्टडीरूमवर एक खुनी सावट पसरलेले आहे. प्रिन्सिपॉल जाधवराव घामाने थबथबून हातातल्या पॅडवर काहीतरी रेघोट्या मारीत बसले आहेत. शांत आणि विचारमग्न दाजीसाहेब एकटक जाधवरावांकडे पाहात आहेत. बाराचे टोले पडू लागतात. जाधवराव क्षणभर दचकतो नि पुन्हा मान खाली घालतो. जाधवरावांच्या भित्रेपणाला दाजीसाहेब हसतात नि सोड्याची बाटली फोडतात. ]

दाजीसाहेब : मग काय प्रिन्सिपॉलसाहेब ! भाषण लिहून झालं का ?
जाधवराव : ( भांबावून ) अं ... ? हे काय, लिहितोय ना ... लिहितोय ...
दाजीसाहेब : चांगलं अभ्यासपूर्ण लिहा. परिषदेसमोर करायचं भाषण...

[ ग्लासात व्हिस्की ओततो. ]

जाधवराव : विषय काय म्हणालात दाजीसाहेब ?
दाजीसाहेब : हाच ... दारूबंदी आणि दारूचे दुष्परिणाम.

[ जाधवराव दारूने भरलेला ग्लास चटकन पितो. ]

दाजीसाहेब : प्रिन्सिपॉलसाहेब, पूर्वी कसं एकेक भाषण म्हणजे एकेक प्रबंधच लिहून द्यायचेत तुम्ही. आता नाही देत तसे. आमची तक्रार आहे.

जाधवराव : तक्रार आमचीदेखील आहे दाजीसाहेब. पूर्वी तुम्ही महिन्यातून दोन-चारच भाषणं करायचात. आता आठवड्याला पाच-दहा भाषणं करता.

दाजीसाहेब : करावी लागतात, करावी लागतात. पुढारी नेहमी हालता बोलता राहावा लागतो जाधवराव.

जाधवराव : खरंय...खरंय ..वन मोअर लिटल पेग दाजीसाहेब! (ग्लास आपटतो.) वन मोअर लिटल पेग.

दाजीसाहेब : नो ... सॉरी ... प्रिन्सिपॉलसाहेब! राजकारणात प्रत्येक वाईट काम पूर्ण शुद्धीवर राहून आणि संपूर्ण विचारान्तीच करायचं असतं आज तुम्ही आम्ही फार पिऊन चालणार नाही.

जाधवराव : मग या एका पेगची तरी काय गरज होती ?

दाजीसाहेब : होती. मला नाही तरी तुम्हाला गरज होती. तुमच्या छातीतील धडधड थांबण्यासाठी.

जाधवराव : (बळेबळे हसत) ऑं ... नो ... नो ... नो दाजीसाहेब! मी काय भ्यायलो वगैरे नाहीय हां ... आय ॲम नॉट ए कॉवर्ड ... आय ॲम चिकन हार्टेड ... ऑं ... आय ॲम नॉट चिकन हार्टेड ... !

[एकदम दिवे मंदावतात ... खालून पोलिस व्हॅन कर्कश सायरनचा आवाज करीत निघून जाते.]

जाधवराव : (लटपटत उभा राहतो.) झाला. दाजीसाहेब...झाला त्याचा खून झाला ...त्याचा खून झाला...दाजीसाहेब! (त्याच्या तोंडाला कोरड पडते.)

दाजीसाहेब : (शांतपणे) नाही ... अजून तो जिवंत आहे.

जाधवराव : कशावरून ?

दाजीसाहेब : (त्याच्याकडे टॉवेल फेकत) आधी घाम पुसा जाधवराव! पोलिस व्हॅन इकडे तलावाकडे गेलीय. आणि गर्जनाचं ऑफिस तिकडे टाऊन हॉलकडे आहे.

जाधवराव : (शरमिंदा होत) ... हो खरंच की! मी विसरलोच ... विसरलोच.

दाजीसाहेब : विसरला नाहीत ... घाबरलात. घ्या ... आणखी घ्या ... हा एक पेग... शेवटचा ... पुन्हा मागू नका ... जिवात जीव येईल. घ्या ... घ्या.

[जाधवराव खालच्या मानेने पेग घेतो.]

जाधवराव : (पिता पिता ...) दाजीसाहेब, माणसाचं आयुष्य फार किमती असतं नाही ?

दाजीसाहेब : माणसाचं आयुष्य किमती नसतं प्रिन्सिपॉलसाहेब ! माणसाला... प्रिन्सिपॉलसाहेब प्रत्येक माणसाला किंमत असते. प्रत्येक माणसाची किंमत असते...तुमची किंमत किती ? दोन हजार रुपये महिना पगार आणि बंगला ..बस्स ! एकदम स्थिर बाजारभाव ..आणि माझी किंमत...? थोराताला मुख्यमंत्री करताना मी मिनिस्ट्री मागितली ... त्याच थोराताला पाडून जेध्याला मुख्यमंत्री करताना कॅबिनेट मिनिस्ट्री मागितली ... माझी किंमत ही अशी...शंभर नंबरी सोन्यासारखी सतत वाढती...तेजीचा बाजार. जाधवराव, आपण त्यालाही त्याची किंमत विचारली होती. त्याच्या साप्ताहिक गर्जनाचं दैनिक गर्जना करायला आपण तयार होतो...तो म्हणाला माझी किंमतच करता यायची नाही...थोडक्यात काय कवडी किंमतीचा जीव...जगला काय, मेला काय. मनाला लावून नाही घ्यायचं.

जाधवराव : हॅ...मनाला कोण लावून घेतोय, बोलून चालून आमच्या जिवावर उठलेला वैरी तो... तरी पण, दाजीसाहेब माणूस.. माणूस मोठा ध्येयवादी होता नाही ?

दाजीसाहेब : ऑल हंबक ! म्हणे ध्येयवादी ! प्रिन्सिपॉलसाहेब, अर्थशास्त्राचे प्रोफेसर तुम्ही...देशात एकंदर करन्सी किती तेवढं सांगता का ?

जाधवराव : बावीस हजार कोटी रुपयांची.

दाजीसाहेब : दॅटस् इट ! जाधवराव, दॅटस् इट ! साठ कोटी माणसांच्या देशात बावीस हजार कोटी रुपयांच्या नोटा...प्रिन्सिपॉलसाहेब ज्या देशात माणसांच्या संख्येपेक्षा नोटांची संख्या जास्त असते ना, तेथे ध्येयवाद वगैरे काही असत नाही. असतो फक्त भाबडा मूर्खपणा . मूर्ख स्वप्नाळूपणा. बिचारा मूर्ख स्वप्नाळू होता.

जाधवराव : हो...आणि जे स्वप्न पाहतात ते संत होऊन क्रुसावर चढतात.

दाजीसाहेब : संत होऊन क्रुसावर नाही चढत. ते फक्त क्रुसावर चढतात...आणि त्यांना क्रुसावर ठोकणारेच नंतर त्यांना संत बनवून स्वतः संतांच्या देवळाचे बडवे होतात . जाधवराव, उद्या संध्याकाळच्या भिकार सभेसाठी माझं भाषण तयार करा...त्यात . गर्जनाचा संपादक नाही गेला...टिळक-आगरकरांच्या परंपरेतला शेवटचा दुवा गेला...असं ठणकावून लिहा...

जाधवराव : लिहितो ... लिहितो ... पण, दाजीसाहेब हा खून आपल्या गळ्याशी नाही ना येणार ?

दाजीसाहेब : बिल्कुल नाही .... आम्ही पहिला काटा काढला तेव्हा कॉर्पोरेटरचे मेयर बनलो. दुसरा काढला तेव्हा मेयरचे आमदार, तिसरा काढला तेव्हा आमदाराचे मंत्री आणि चौथा काढला तेव्हा आम्ही मंत्र्याचे कॅबिनेटमंत्री झालो ... पाचवा काटा काढायला पाहिजे होता. पण, काढला नाही.

आणि नेमका तोच आमच्या खुर्चीला सलला. मिनिस्ट्रीचा राजीनामा द्यावा लागला.

जाधवराव : म्हणजे ... तुम्ही आजवर चार खून पचवलेत दाजीसाहेब ?

दाजीसाहेब : शीः शीः शीः शीः! खून हा फारच खुनी शब्द जाधवराव. अहो, खून खुनी करतात. आम्ही राजकारणी लोक ... आम्ही खून नाही ... वध करतो! निर्वेधपणे राजकारण करायचं म्हटलं की, इकडचे तिकडचे चार वध करावेच लागतात ... सलणारे काटे काढावेच लागतात.

जाधवराव : पण दाजीसाहेब, खरंच हा काटा फार सलत होता ?

दाजीसाहेब : नाही. तसा काही फारसा सलणारा नव्हता. आम्ही राजकारणात आलो तेच मुळी गेंड्याची कातडी आणि गाडाभर अब्रू घेऊन ... हा वेडा किती अब्रू रस्त्यावर काढणार होता? बस्स? सतरा लाखाची ...? त्यातलं देखील चार लाखाचं फ्रॉड तुमचं ... चार बिनपुराव्याचे खुनाचे आरोप ... इलेक्शन तोंडावर आली नसती ना, तर जाधवराव ही गर्जना एखाद्या पेगबरोबरच आम्ही गिळून टाकली असती ... आणि वर्षा-सहा महिन्यानं लोकदेखील विसरून गेले असते ... यालाही जीव गमवावा नसता लागला. पण दुर्दैव याचं, इलेक्शन तोंडावर आलं असताना आमच्यावर घाव घालायला निघाला....!

जाधवराव : दुर्दैव त्याचं नाही, त्याच्या बायकापोरांचं दाजीसाहेब. आधीच कर्जबाजारी माणूस ... आता तर त्याची बायको, पोरगी अन्नाला मोताद होतील.

दाजीसाहेब : कशा होतील? ... आणि तेही तुम्ही आम्ही असताना? शक्य नाही. आपण त्यांना मदत करू!

जाधवराव : वर पुन्हा आपणच त्यांना मदत करायची ?

दाजीसाहेब : हो! त्यात हरकत कसली? जाधवराव, राजकारणात कधी कधी क्रूरपणे वागावं लागतं, म्हणून काही कायमचं दुष्ट होण्याची गरज नाही ... आपण एक ट्रस्ट उभा करू. आणि कर्जासकट 'गर्जना' चालवायला घेऊ. आणि त्या मायलेकीसाठी सरकारकडून पेन्शन मिळवू. वर पुन्हा तातडीने पंधरा वीस हजार रुपये रोख मदत म्हणून देऊ ... कल्पना कशीय ?

जाधवराव : फारच छान! म्हणजे आयताच हातात एक पेपर येईल. आणि त्या मायलेकरांना मदत केल्याचा मोठेपणाही मिळेल. फारच धूर्त चाल ...!

दाजीसाहेब : (अंतर्मुख होत) धूर्त चाल? ... प्रिन्सिपॉलसाहेब, प्रत्येक गोष्टीत मी राजकारण साधायचा प्रयत्न करतो याचा अर्थ प्रत्येक गोष्ट मी राजकारणासाठीच करतो असं नाही.

जाधवराव : म्हणजे ?

दाजीसाहेब : कधी कधी माझं मलाच कळत नाही की, मी धूर्तपणे वागतोय का माणुसकीने? पण नाही, जाधवराव नाही. राजकारण करायचं म्हटलं की, नुसती माणसं मारून चालत नाही ... माणसं जगवावीही लागतात ... वाढवावीही लागतात .. आम्हीही खूप माणसं जगवली ... वाढवली .... आता हा आपला बाप्पाजी... !

जाधवराव : वा! विद्वान माणूस. मोठा कायदेपंडित.

दाजीसाहेब : हां ... पण हाच कायदेपंडित वीस वर्षांपूर्वी उसवलेल्या कोटाचा ... नि फाटक्या खिशाचा एक ब्रीफलेस बॅरिस्टर होता.

जाधवराव : काय सांगता?

दाजीसाहेब : माझं ग्रोसरीचं दुकान होतं तेव्हा! अजिजीनं, लाचारीनं ओळख नसताना दुकानात आला होता माझ्या .... उधारीवर दुधाच्या पावडरचा डबा मागायला ... पोरीच्या दुधासाठीसुद्धा पैसा नव्हता त्याच्याकडे.... विचार केला, माणूस विद्वान आहे .... सांभाळावा.

जाधवराव : सांभाळावा?

दाजीसाहेब : हां ... जाधवराव, राजकारण करायचं म्हटलं की, चार गुंडांबरोबर चार विद्वानही पदरी बाळगावे लागतात.

जाधवराव : खरंय, खरंय. आता सांगितलं तर खोटं वाटेल, एवढा मोठा कायदेपंडित ... लखपती माणूस...पोरीच्या दुधालाही महाग होता ... नशिबानं हात दिला बेट्याला.

दाजीसाहेब : नशिबानं नाही जाधवराव, नशिबानं नाही. या दाजीसाहेबानं हात दिला. या नोटांच्या जगात...आणि दरडोई मतांच्या देशात ... दैव आणि नशीब नाही ... फक्त पुढारीच हात देतो ... नाहीतर तुम्हीच सांगा जाधवराव ... तुमच्यासारखा थर्डक्लास एम. ए. बापडा, जन्मात कधी प्रिन्सिपॉल झाला असता?

जाधवराव : कधी नाही ... कधी नाही. बस्स, आपली कृपा म्हणून ...

दाजीसाहेब : अशीच कृपा आम्ही बाबीच्या मैत्रिणीवर केली.

जाधवराव : बाबीच्या मैत्रिणीवर?

दाजीसाहेब : हां.. बाबी, म्हणजे बाप्पाजींची मुलगी, माझी भावी सून.

जाधवराव : काय सांगता?

दाजीसाहेब : तर, या बाबीची मैत्रीण सुमी ... म्हणजे या गर्जनाची मालकीण– संपादकाची बायको, कुणा शाळा मास्तराची मुलगी, आमच्या दारा-अंगणात खेळलेली. वाढलेली. पुढं लग्न झालं तेव्हा गर्जनासाठी पेपरचा कोटा मागायला आली होती. दिला मिळवून. म्हटलं मुलगी आपलीच आहे.

जाधवराव : खरंच खरंच ... !

दाजीसाहेब : पुढं तिलाही मुलगी झाली. बारशाला बोलावलं होतं मला ... चांगलं दोन तोळ्याचं लॉकेट घातलं आहेरात.

जाधवराव : दोन तोळयाचं ?

दाजीसाहेब : सुमी मला म्हणाली सुद्धा, एवढं लॉकेट काय करायचं ? मी म्हटलं....अगं, माझी नात चांगली तरुणपणीसुद्धा घालेल हे लॉकेट.

जाधवराव : हो ना...आतादेखील गळयात असेल तिच्या...आता चांगली पाच-सहा वर्षांची असेल नाही तुमची ही नात ?

दाजीसाहेब : हां असेल...सहा वर्षांची तर निश्चितच असेल...

[ पुन्हा दिवे एकदम मंदावतात...खालून पोलिस व्हॅन सायरन वाजवत जाते...जाधवराव पुन्हा लटपटतो. दाजीसाहेब मात्र हातावर मूठ आपटत शांतपणे उठतो. ]

दाजीसाहेब : संपलं...खेळ खलास...नाऊ ही इज नो मोअर...वाईट झालं...फार वाईट झालं...चला, निघतो मी जाधवराव.

जाधवराव : आपण कुठं निघालात दाजीसाहेब ?

दाजीसाहेब : कुठं निघालो ? जाधवराव, माझ्या मतदारसंघातली एक तरुण मुलगी विधवा झाली.. तिच्या सांत्वनाला मी जायला नको ? माझ्या मतदारसंघातली एक गोड मुलगी...माझी नात अनाथ झाली...तिच्या पाठीवर मायेचा हात मी फिरवायला नको ?

जाधवराव : पाहिजे ना...पाहिजे ना ! पण दाजीसाहेब, मी इथं बसून काय करू ?

दाजीसाहेब : गेना आणि मारत्या येतील आता...त्यांना सांगा उद्या संध्याकाळी टाऊन हॉलपुढे धिक्कार सभा घ्यायचीय...गावभर चुन्यानं भिंती, रस्ते रंगवा. पोस्टर छापून लावून घ्या. स्टेज बांधा. सकाळी गाडीतून गावभर सभेचा प्रचार करा.

जाधवराव : सभेचा विषय ?

दाजीसाहेब : हाच. या खुनाची न्यायालयीन चौकशी झालीच पाहिजे !

जाधवराव : हो...भाषणही लिहितो...टिळक-आगरकरांच्या परंपरेतला शेवटचा दुवा गेला...

दाजीसाहेब : आणि शुगर फॅक्टरीच्या बोर्डापुढं ... आज मीटिंगमध्ये ठराव ठेवा ... गर्जनाच्या संपादकाच्या बायको-मुलीला त्वरित दहा हजार रुपये मदत म्हणून देण्याचा.

जाधवराव : ठेवतो...ठेवतो ..

[ जिन्यावर पावलांचे आवाज. गेना आणि मारत्या मोठ्या खुशीत... मिजाशीत येतात. आल्या आल्या अंगातील लेदर जाकिटे काढतात ... त्यांच्या शर्टावर रक्ताचे डाग... ]

गेना : दाजीसाहेब ... काढला, पुरता काटा काढला .. काम फत्ते केलं.
दाजीसाहेब : फार वाईट केलंत.
गेना : म्हणजे ?

[ दोघेही चपापतात. ]

दाजीसाहेब : गेना, आयुष्यात वाईट कामं करावी लागतात....आणि ती करायचीही असतात ... पण, त्यांची मिजास नसते मारायची ... वाईट काम केल्या केल्या ते केलं हेही विसरून जायचं असतं. आता चांगल्या कामाला लागा....उद्याच्या धिक्कार सभेची तयारी करा.
गेना : ती करतोच . पण दाजीसाहेब, एक घोटाळा झालाय.
दाजीसाहेब : काय झालाय ? काही पुरावा मागं ठेवून आलात काय ?
गेना : नाही...पण दोन आयविटनेस...
दाजीसाहेब : काळजी नको, चुकून जरी पकडला गेलात तरी बाप्पाजीला उभा करीन, तुमचा बाल बाका नाही व्हायचा.
गेना : पकडतंय कोण दाजीसाहेब...ते दोन्ही आयविटनेस जागच्या जागी खलास केले !
दाजीसाहेब : कोण होते ते ?
गेना : होती...त्या संपादकाची बायको आणि मुलगी.

[ गॉंग....दाजीसाहेबाला धक्का बसतो...जाधवराव तर थरथर कापायला लागतात...दाजीसाहेब टेबलावरचा दारूचा ग्लास गेना आणि मारत्याच्या तोंडावर मारत...]

दाजीसाहेब : ( कडाडत ) अरे, माणसं आहात की खाटकं आहात ? एका गरीब पोरीला आणि छोकरीला मारलंत ?
गेना : ( उद्दामपणे ) नाइलाज होता, दाजीसाहेब ! गर्जनाच्या ऑफिसवर संपादक एकटा असतो म्हणून गेलो...पण आतल्या खोलीत ती बाई नि मुलगीदेखील होती. आम्हाला काय माहीत ? आम्ही भोसकला संपादकाला.

पार डेंडाळा बाहेर काढला. तो बोंबलला आणि आतनं ती बाई धावत आली...बायको त्याची...

जाधवराव : तीच....तीच...तिला काय केलं तुम्ही ?

गेना : करायचं काय ? आय विटनेस थोडाच ठेवायचा...तिलाही दिला सारून... केले लाइट ऑफ !

जाधवराव : मग ? ती मुलगी ? तिचं काय ?

गेना : लाईटस् ऑफ केले...तेवढ्यात आणखी कोणी तरी धावत आलं आतनं...अंधारातच भोसकलं तिलाही...आम्हाला काय माहीत ती लहान मुलगी असेल...

जाधवराव : ( रडवेल्या आवाजात ) अरे, काय केलंत रे हे...? काय केलंत ?

दाजीसाहेब : ( चढ्या आवाजात ) गेन्या, मी गुन्ह्याचा धनी होतो...पापाचा नाही... संपादकाला मारणं हा गुन्हा होता...त्या अश्राप मुलीला नि छोकरीला मारण्याचं पाप तुम्ही केलंत...त्याचा धनी मी नाही....त्याचे धनी तुम्ही.

गेना : कुणी का असेना धनी ? दाजीसाहेब, उघडकीला कशाला येतंय ?

दाजीसाहेब : येईल....उघडकीला येईल. गेन्या, नुसता संपादक मारला असतात, तर लोक बोलले असते भानगड असेल .... बाईची नाही तर पैशाची. ....फुकट खून, कोण....कुणाचा....कशाला करेल ? लोकांनी लक्ष नसतं दिलं या खुनाकडे....पण, एक तरुण मुलगी नि गोड पोरगी मारलीत तुम्ही ! आख्खा गाव आता बोंबलत उठेल. प्रत्येक माणूस या खुनाकडे रोखून पाहील. गेना, देवाची देखील नजर चुकवता येते, पण लोकांची नजर नाही चुकवता येत.

गेना : काय म्हणताय काय दाजीसाहेब ?

दाजीसाहेब : म्हणत नाही, सांगतोय....पोलिस-चौकीत जाऊन हजर व्हा. हा पापाचा बोजा तुम्हीच तुमच्या शिरावर घ्या. याच्याशी माझा काही एक संबंध नाही.

गेना : स्वतःसाठी आम्हाला खड्डयात लोटायला निघालात, दाजीसाहेब.

दाजीसाहेब : नाही, तुम्हाला खड्डयात नाही लोटत ... तुम्हाला सोडवायला वाट्टेल तेवढा खर्च करीन मी. तुमच्या बायकापोरांना आरामात ठेवीन...तुमच्यासाठी बाप्पाजीला वकीलपत्र घ्यायला लावीन ... सरकारचा ॲटर्नी जनरल होता बाप्पाजी....तुम्हाला हसत खेळत सोडवेल.

गेना : एवढी खात्रीय बाप्पाजींविषयी ?

दाजीसाहेब : हो .. हो ... बाप्पाजी काय, यमालाही खुनाच्या आरोपातून सोडवेल.

गेना : ठीक आहे. तर मारतो आम्ही खड्डयात उडी .... पण एकटे नाही, तुमच्यासकट .... आणि आधीच्या चार खुनांसह ....

दाजीसाहेब : माझ्यासकट .... आधीच्या चार खुनांसह .... ?

गेना : घाबरू नका ... दाजीसाहेब ! बाप्पाजी सोडवतील की आपल्याला ... तुम्ही कशाला, आम्हीच भरपूर खर्च करू ... ही पाहा खर्चाची सोय. ( लॉकेट दाखवतो. )

दाजीसाहेब : हे काय आहे ?

गेना : लॉकेट ... त्या पोरीच्या गळ्यात होतं ...

[ दाजीसाहेब एकदम मटकन खुर्चीत बसतो ... जाधवराव तडफडत उठतो नि समोर हात दाखवीत ओरडत किंचाळतो .... ]

जाधवराव : ती पाहा ... ती पाहा ... दाजीसाहेब, ती पाहा, पाहतीय रोखून ... टक लावून पाहातीय ....

गेना-दाजी : कोण पाहतीय ? कोण पाहतीय ?

जाधवराव : ती ... ती ... लहान मुलगी दाजीसाहेब, लहान मुलगी ... सह वर्षांची ...

[ जाधवराव एकदम मान खाली घालून ओक्साबोक्सी रडू लागतो. लहान मुलीचा आवाज ... " आई, आई ... माझ्या मानेला लागलं ... रक्त येतंय ... आई रक्त येतंय ... " ]

♠ ♠

## अंक पहिला : प्रवेश दुसरा

[ पहिल्या प्रवेशातील लहान मुलीचे कण्हणे कमी होत जाते ... तशा तशा कैद्याच्या किंकाळ्या आणि शिव्या ऐकू येऊ लागतात. " मिरचीची धुरी द्या ... उलटा टांगा ... हरामखोर ... गांडीला दात फुटले तुझ्या ! ... तू काय तुझा बाप बोलेल ... " अंगावर काटा उभा करणाऱ्या किंकाळ्या कमी कमी होत जातात ... प्रकाश पडू लागतो ... पोलिस-चौकी दिसू लागते ... नवशिका तरुण सबइन्स्पेक्टर थोरात आत इन्ट्रागिशन रूमकडे भयचकित होऊन पाहात असतानाच इन्स्पेक्टर गावडे घाम पुसत बाहेर येतो. खुर्चीत बसतो ... प्रौढ आणि मुरलेला बनेल इन्स्पेक्टर. ]

गावडे : च्यायला, सालं पांढरपेशं पब्लिक असलं म्हणजे बरं असतं ... नुसतं शिव्यानं काम भागतं .... हा असला सडकछाप माल. साला जीभही चालवा, हातही चालवा, पायही चालवा ! थोरात, बघा ... तुम्हालाच जमेल ! तेव्हा धुलाई करा. पाहा काय बोलतोय का ! ( सिगारेट पेटवतो ) साला कंपोजिटर आहे का किंगकाँग ... मार मारून हात थकले तरी तोंड नाही उघडत. कसे, काय म्हणून खून झाले, समजायचं कसं ... ?

थोरात : कसे झाले असतील ? तुम्हाला काय वाटतं साहेब ?

गावडे : मला काय वाटतं ? मला वाटतं थोरात, पुन्हा जाऊन पी. टी. एस.ला भरती व्हावं. फौजदारीची परीक्षा द्यावी. सतरा वर्षं काढली या चौकीवर... पण अशी भानगड कधी झाली नव्हती ...

थोरात : सतरा वर्षं काढलीत ? या एकाच चौकीवर ?

गावडे : का ? आश्चर्य वाटतंय का ? एकदम सुखाची सर्व्हिस ! हप्ता खायचा नि तक्ता भरायचा, नो भानगड.

थोरात : पण सतरा वर्षं एकाच चौकीवर ?

गावडे : त्याचं काय आहे थोरात, नव्यानं भरती झालात तुम्ही. थोरात, सुखानं नोकरी करायची तर वशिला नाही लावायचा.

थोरात : मग ?

गावडे : वशिल्याच्या कामी पडायचं.

थोरात : म्हणजे ?

गावडे : म्हणजे पाहा, दाजीसाहेब माजी गृहमंत्री. एक्स होम मिनिस्टर, मोठा पुढारी. आख्खं खातं वशिला लावायला मरायचं ... आपण वशिला नाही लावला. फक्त त्यांच्या कामी आलो. एकदा या दाजीसाहेबांच्या पोरानं नशेतच फुटपाथवरच्या एका भिकारणीला चिरडलं गाडीखाली ...

थोरात : मग ?

गावडे : मग काय ? रस्त्यावरचीच भिकारीण ती ... जगली काय, मेली काय ... सारं सारखंच ... मी निपटली केस. भानगड फाईल केली. दाजीसाहेबानं दहा हजार रुपये देऊ केले.

थोरात : दहा हजार रुपये ?

गावडे : मी घेतले नाहीत. म्हटलं, दहा हजार रुपये काय जन्माला पुरायचे आहेत ? दाजीसाहेब चार पिढ्यांना पुरेल ... बस्स ! तेव्हापासून दाजीसाहेबांची मेहेरबानी आहे नि ही सोन्याचं अंडं देणारी चौकी आपल्या ताब्यात आहे ... मटका चाललाय ... भट्टी चाललीय ... फक्त खून नाही ... साला हीच पहिली पनवती.

थोरात : पण गेल्या इलेक्शनला दोन खून झाले होते ना ?

गावडे : हां, झाले होते. पण ते राजकीय खून होते थोरात. ह्या राजकीय खुनांचं एक बरं असतं, जे करतात तेच निभावून नेतात. आपण फक्त तपास लागत नाही म्हणून केस फाईल करायची. साला, ही ट्रिपल मर्डरची काय केस आहे ती कळूनच नाही राहिली !

थोरात : मला वाटतं साहेब, पैशावरनं हे खून झाले असावेत.

गावडे : कशावरून ?

थोरात : या गर्जनाच्या संपादकाला खूप कर्ज होतं म्हणे ...

गावडे : मूर्ख आहात थोरात. अहो, कर्जबाजाऱ्याचा खून कोण करणार ? आपला देणेकरी मरावा, असं कोणा तरी येणेकऱ्याला वाटतं का ? आत्ता असं पाहा, मला आहेत चार जावई. एका तरी जावयाला मी मरावं असं वाटेल

का ? अहो, वर्षाला पोरींची बाळंतपणं असतात ... दिवाळसण असतात. काय ?

थोरात : म्हणायचंय काय आपल्याला ... नाही कळलं ...

गावडे : काय म्हणायचंय ? एवढंच म्हणायचंय, नवे आहात ... आमच्यासारख्या जुन्या जाणत्याकडनं शिकून घ्या. नोकरी कशी करायची आणि चाकरी कशी करायची.

थोरात : नोकरी ... चाकरी ... दोन असतात काय ?

गावडे : असतात बाबा असतात. नोकरी पगारासाठी ... चाकरी वरकमाईसाठी. आत्ताच कळायचं नाही तुम्हाला. चार पोरी झाल्यावर कळेल. जा त्या सिव्हिल हॉस्पिटलला फोन लावा. डॉक्टर आहेत का हजाम ... कोणास ठाऊक !

[ थोरात फोन करायला लागतो, तोच जमादार थोपटे येतो. ]

थोपटे : साहेब, त्या भिक्याला आणलंय धरून ... समोर उभा करू का ?

गावडे : करू का म्हणजे ? तिथी पाहताय का ?

[ थोपटे जातो. ]

थोरात : ( फोनवर ) हॅलो ... सिव्हिल हॉस्पिटल ? डॉ. राणे आहेत काय ? ... मी सबइन्स्पेक्टर थोरात बोलतोय.

[ थोपटे भिक्याला पकडून आणतो. सामान्य घरगडी ... मळका पायजमा, शर्ट, फाटक्या अंगाचा...पकडल्याने भेदरलेला, कमरेत वाकून हात जोडून लीन–दीनपणे उभा राहतो. ]

थोपटे : साहेब, हा याला उभा केलाय.

[ गावडे भिक्याला एकवार आपादमस्तक न्याहाळतो. दोन झुरके ओढतो ... एवढा काळही भिक्या अस्वस्थ होतो. तो बोलायला तोंड उघडतो तोच गावडे कडाडतो ... ]

गावडे : आंडगुळं सुजली काय तुझी ? मग नीट उभा राहा ना ! भाड्या ! नीट उभा राहा.

[ भिक्या कसाबसा नीट उभा राहतो. थोपटे त्याला दंडुक्याने ढोसून पुन्हा नीट उभा करतो. गावडे आणखी दोन झुरके ओढतो. ]

गावडे : नाव काय तुझं ?

भिक्या : भिक्या.

गावडे : कुणी ठेवलं ? आईनं का बापानं ?

भिक्या : दोघांनी ! हां ... हां ... दोघांनी.

गावडे : म्हणजे, आईबाप दोघे हायेत का तुला ? मग का रे असा बेवारशी कुत्र्यासारखा वागलास तू ?

भिक्या : मी काय वागलो साहेब ?

गावडे : तेही आम्हीच सांगायचं का ?

[ नंतर एकदम त्याच्याकडे दुर्लक्ष करून थोरातांकडे पाहतो. थोरात फोन खाली ठेवतो ]

गावडे : काय थोरात, प्रेतं फाडून झाली का ?

थोरात : नाही ... बारा वाजेपर्यंत पोस्टमार्टमचा रिपोर्ट मिळेल म्हणून सांगितलंय.

गावडे : ते काय देणार रिपोर्ट ? डॉक्टरनं फाडायच्या आधी यानंच उभं-आडवं फाडून ठेवलंय तिघांना ... लहान पोरगी, तिच्यावरही चार चार घाव... अरे अरे अरे !

भिक्या : ( थरथर कापत ) मी नाही कुणाला मारलं साहेब ...

गावडे : ( कडाडत ) तू चूप बस भडव्या ... तुला विचारलंय का ? ...विचारीन तेव्हा बोल की ... ( पुन्हा थोरातांकडे मोर्चा ) थोरात, कुत्री हुंगून आली का ?

थोरात : हां आली ... पण माग सापडत नाहीय आरोपीचा.

गावडे : कसा सापडणार ? आरोपी इथं आपल्यासमोर...कुत्र्यांना काय सापडणार ? ( भिक्या मटकन् खाली बसतो. ) काय तंगडी मोडली का रे तुझी भिक्या....बसतोस काय ? उभा राहा ! का खोड्यात घालून उभा करू ? ( भिक्या लटपटत उभा राहतो. ) थोरात, हे पंचनाम्याचे कागद पुन्हा एकदा डोळ्याखालून घाला. काय कमी जास्त नाही ना, ते पाहा.

थोरात : ( पुढे होत कागद उचलत ) यस-सर.

गावडे : ( आवाजात गोडवा आणीत ) मग काय भिकाजीराव ? काय काय कामधंदा करता तुम्ही ?

भिक्या : घरकाम करतो साहेब.

गावडे : कुणाकडे ?

भिक्या : संपादकसाहेबांकडे !

गावडे : मग ? घरकाम करून पोटापुरतं मिळत नाही का खायला ?

भिक्या : मिळतं ना साहेब.

गावडे : मिळतं ना ? मग खाल्ल्या ताटात केव्हापासनं हागाया लागलास तू ?

भिक्या : मी काय ... मी काय केलं साहेब ?

गावडे : अरे, खून केव्हापासनं करायला लागला रे बाबा तू. आणि तेही एकाच वेळी तीन तीन...

भिक्या : पण मी खून कोणाचा केला साहेब ?

गावडे : म्हणजे ? केला तेव्हा पाहिला नाही का तू ? माणूस न पाहताच खून केलास ?

[ भिक्या ओक्साबोक्शी रडू लागतो. ]

भिक्या : मी नाय कुणाचा खून केला साहेब .... मी नाय कुणाचा खून केला ....

गावडे : वा रे वा ! काय रडतंय ! काय नाटक करतंय ! भाडया, तुझ्या रडण्यानं आमची इजार ओली होणार आहे काय ? बोल, कशाला खून केले ? का केले ... ?

भिक्या : मी नाही कुणाचा खून केला साहेब, लेकराची शपथ घेतो ....

गावडे : दुसऱ्याच्या लेकराला मारलंस. आता स्वतःच्या लेकराची शपथ घेतोस ? खोट्या शपथा घ्यायला लाज नाही का वाटत ? बोल, बोल.

भिक्या : नाही साहेब. मी नाही. मी नाही.

गावडे : असा सिधा बोलायचा नाहीस तू...थोपटे, याला सस्पेक्टमध्ये बंद करा. रात्री निवांतपणे याची धुलाई करू. मग बोलेल पोपटासारखा. करा बंद साल्याला.

[ थोपटे भिक्याची गचांडी धरून नेतो. तोच बाहेर गाडीचा हॉर्न वाजतो. गावडे बाहेर डोकावतो. दाजीसाहेब मोठ्या कुऱ्यात आत येतात. पाठोपाठ गेना...]

गावडे : या या दाजीसाहेब ! या या. हवालदार खुर्ची !

[ थोपटे हवालदार खुर्ची आणून ठेवतो. दाजीसाहेब बसतात. ]

गावडे : दाजीसाहेब, लोकांनी तुम्हाला दिल्लीला पाठवलं आणि तुमचं दर्शन दुर्मिळ झालं. दाजीसाहेब, काय घेणार? कॉफी का रस ?

दाजीसाहेब : का ? ( आवाज चढवीत ) पोलिस स्टेशनचं रसवंतीगृह केलंय काय तुम्ही ?

[ सर्वजण चपापतात. ]

गावडे : काय झालं काय, दाजीसाहेब ?

दाजीसाहेब : काय झालं ? तीन खून पडले गावात, पण तुमच्या तक्त्याने काय त्याची खबर घेतलेली दिसत नाही. ( थोपटे पुढे होऊन तक्ता भरू लागतो. ) एका प्रतिष्ठित पत्रकाराचं अख्खं घर बरबाद केलं खुन्यांनी...आणि तुम्ही रस मागवताय ?

गावडे : पहाटेपासून पंचनाम्याचंच काम चाललं होतं दाजीसाहेब.

दाजीसाहेब : पंचनामा केल्यानं काय प्रेतं उठून बसतात काय ? पंचनामा कसला करता ? एवढा पोलिस फोर्स आहे इतक्या छोट्याशा गावात. अजून तुम्हाला खुनी पकडता नाही आला ?

गावडे : संशयितांचाच शोध घेतोय. खुनामागचा मोटिव्ह कळला म्हणजे तपास सोपा होईल.

थोरात : मला वाटतं दाजीसाहेब, हे पोलिटिकल मर्डर असावेत.

दाजीसाहेब : इंडियन पिनल कोडात पोलिटिकल मर्डर, वैचारिक मर्डर, नैतिक मर्डर, असे काही अद्याप लिहिलेले नाहीत. खून तो खून. ३०२, खुनी पकडा आणि फासावर लटकवा. गावात असंतोष माजलाय पोलिसांविरुद्ध.

गावडे : दाजीसाहेब, खुनामागचा मोटिव्ह आम्हाला एकदा कळू दे. चोवीस तासांत संशयित पकडून दाखवू.

दाजीसाहेब : खुनामागचा मोटिव्ह ? तुम्हाला अजून ठाऊक नाही झाला ?

थोरात : काय आहे दाजीसाहेब, संपादकसाहेबांची परिस्थिती हलाखीची होती. तेव्हा पैशाचं कारण नसावं. बरं चारित्र्यानेही शुद्ध होते. तेव्हा बाईचं निमित्त तरी असू शकत नाही. म्हणूनच मला वाटतं काहीतरी राजकीयच कारण असावं.

दाजीसाहेब : तुम्हाला थोडी फार अक्कल आहे तर ! गेना...( गेना पेपर घेऊन येतो. ) ह्या कोतवाल चावडीला गर्जनाचे अंक दे ! वाचा...वाचा... म्हणजे खुनामागचा उद्देश सापडेल तुम्हाला !

थोरात : ( वाचतो ) आमची १ मे ची गर्जना.. !
भ्रष्ट नेतृत्व नेस्तनाबूत करा. लाखो रुपयांचा अपहार करणाऱ्या, चार खून

पचविणाऱ्या एका भ्रष्ट पुढाऱ्यास ' गर्जना ' चव्हाट्यावर ओढणार ! जिल्ह्याच्या राजकारणात वादळ उडवून देणार ! ' गर्जना 'चा खास अंक आजच राखून ठेवा.

दाजीसाहेब : दॅटस् इट ! कोणा पुढाऱ्याची भानगड निघणार होती ? काढा शोधून. चार तासांत खुनी सापडेल. निवडणुका तोंडावर आल्या असतानाच खून झालेत ते लक्षात ठेवा.

गावडे : म्हणजे, फार मोठ्या लोकांची चौकशी करावी लागणार तर.

दाजीसाहेब : कोण मोठे लोक ? कायद्यासमोर सर्व समान. अरे, कोणाही गरिबाला सस्पेक्टखाली बंद करता. गुरासारखे बडवून काढता. मग एवढ्या भयंकर प्रकरणात कचरता कसले ? गावडे, जिल्ह्यातले मोठे पुढारी किती ?

गावडे : आपण धरून चार दाजीसाहेब.

दाजीसाहेब : मग झालं तर. चौघांचीही चौकशी करा. कोणाची भानगड निघणार होती शोधा...आणि त्यालाच सस्पेक्टमध्ये बंद करा. चार तासांत खुनी सापडेल. चला माझ्यापासून चौकशीला सुरुवात करा...हा मी इथं बसलोय.

गावडे : कशाला दाजीसाहेब, शरमिंदे करता आम्हाला ? आपल्यावर भ्रष्टाचाराचा आरोप कोणी स्वप्नात तरी करेल का ?

दाजीसाहेब : स्वप्नात नाही केला तरी भर सभेत करतात ना ? आमच्या इतर पुढाऱ्यांना विचारा.

गावडे : त्याचं काय आहे दाजीसाहेब...राजकारणात आरोप प्रत्यारोप चालायचेच.

दाजीसाहेब : हां, चालायचेच. त्याचं मी तरी कुठं मनावर घेतोय ? पण हे खुनाचं प्रकरण आहे ... माझ्या मतदारसंघात घडलेलं ... लोकांच्यात घबराट पसरलीय...अख्ख्या गावात दहशतीचं वातावरण निर्माण झालंय.... उद्या लोक मला जाब विचारतील...

गावडे : दाजीसाहेब, आपण बिलकूल काळजी करू नका...आठवड्याच्या आत खुनी तुमच्यापुढं उभे करतो.

थोरात : दाजीसाहेब, तुम्हाला स्वतःला कोणाचा संशय येतो ?

दाजीसाहेब : ( बोलण्यासाठी तोंड उघडतात आणि एकदम चूप बसतात. ) हे पाहा, मनाला वाटेल ते, तोंडाला येईल ते बोलायला मी काय सलूनमधला न्हावी नाही...माझ्या बोलण्याचे फार दूरगामी परिणाम होऊ शकतात...

थोरात : हो ..पण तुम्ही अनऑफिशियली सांगा...आम्ही बाहेर कुठे स्फोट नाही करणार...

दाजीसाहेब : ( जरा विचार करून ) नको ! निवडणुका जवळ आल्या आहेत. माझ्यावर राजकीय हेत्वारोप होऊ शकतो. मी दिशा तुम्हाला दाखवलीय, त्या

दिशेने तपास करून पाहा...खुनी सापडू शकेल. निघतो मी. ( उठतात ) गेना, पेटी आहे का एखादी शिल्लक ? घेऊन ये.

[ गेना पेटी आणायला जातो. ]

दाजीसाहेब : गावडे, तुम्हाला माहीत आहे मी खालच्या पातळीवरून कोणतंही प्रकरण हाताळत नाही. या प्रकरणात सुद्धा मी होम मिनिस्टरशी नाहीतर डी. एस. पी.शीच बोलायचं आधी मनात आणलं होतं. तरी पण...मी तुम्हालाच भेटायला आलो. कारण, माझ्या मतदारसंघातले मतदार जसे माझे, तसे तुम्ही....अगदी चतुर्थश्रेणीतले सरकारी कर्मचारीही माझेच आहात. तुम्हा लोकांना बरोबर घेऊनच कामं करायची आहेत. जनतेची सेवा करायची आहे. बस्स ! एवढीच भावना ! पण, तुमच्याकडून या प्रकरणी ढिलाई होत आहे असं जरा देखील वाटलं, तर मात्र मला होम मिनिस्टरशीच बोलावं लागेल.

गावडे : दाजीसाहेब, आपण अगदी निश्चित राहा. आमच्याकडून काही कसूर नाही होणार. ( इतक्यात गेना आंब्याची करंडी आणून ठेवतो. ) हे काय दाजीसाहेब ?

दाजीसाहेब : माझ्याकडून एक छोटीशी भेट ! कोकणच्या दौऱ्यावर होतो, कालच परतलो. गावोगाव सभा झाल्या. लोकांचं प्रेम ! जिथं गेलो तिथं तिथं हारांबरोबर भेटींचा हा ढीग...हंगामातले पहिले आंबे आहेत हे... चाखून पाहा.

गावडे : चवीपुरते काढून घेतो दाजीसाहेब. एवढी पेटी काय करायचीय ?

दाजीसाहेब : घ्या हो ! चांगल्या पाच-पंचवीस पेट्या दिल्या लोकांनी. बरं, नाही म्हणता येत नाही. लोकांची मनं दुखावतात. घरी खाणारे आम्ही इन मीन चार जणं. करणार काय ! येतं ते वाटून टाकतो. ( गहिवरून ) गावडे, लोकांचं असं उदंड प्रेम पाहिलं ना की वाटतं आपल्या सेवेचं चीज झालं. उद्या जर कोणी मला विचारलं ना ..मंत्रिपद पाहिजे का लोकांचे हे प्रेम पाहिजे. मी तात्काळ सांगीन चुलीत घाला तुमचं मंत्रिपद ! बस्स सेवेसाठी सत्ता राबवावी लागते. म्हणून निवडणुका लढवायचं इतकंच ! असो, निघू मी ? ( निघतो. पण दाराशीच थबकून पुन्हा बजावतो. ) गावडे, आधी खुनी पकडा, मगच पेटी फोडा.

गावडे : अवश्य दाजीसाहेब ! अवश्य !

[ दाजीसाहेब निघतात ... ते गेलेले पाहून तुच्छतेने हसत गावडे ... ]

गावडे : थोरात, पेटी फोडा.

थोरात : खुनी पकडल्यानंतरच पेटी फोडायला सांगितलंय ना ?

गावडे : पेटी फोडा, आधी पेटी ! खुनी सापडेपर्यंत आंबेच काय पेटीही नासून जाईल ...

थोरात : ( हसत पेटी फोडता फोडता ) खरंय. मोठ्या पुढाऱ्यांची चौकशी करायचीय ...

गावडे : मोठ्या पुढाऱ्यांची, म्हणजे या दाजीसाहेबांची सुद्धा ! साला, राजकारणात कोण कुणाचा केव्हा जीव घेईल काही सांगता येत नाही.

[ थोरात पेटी फोडतो ... नि पेटीत हात घालतो ... आंब्याच्या जागी नोटांचे पुडके वर येते ... थोरात घाबरून ओरडतो. ]

थोरात : साहेब ... नोटा ...

गावडे : नोटा ?

[ गावडे आश्चर्याने नोटांकडे पाहतो तोच फोन खणखणायला लागतो. नोटा पाहता पाहता गावडे फोन कानाला लावतो नि एकदम अलर्ट होतो. ]

गावडे : कोण ? दाजीसाहेब ? ....हो, अरे हो ... प्रिन्सिपॉल जाधवराव काय ?.... बोला सर ... तुमचं ऐकणार नाही तर कोणाचं ? गुरुदेवो भव सर ... हां ... दाजीसाहेबांचा निरोप ... काय ? असं ... ? ( घाम पुसतो. ) ठीक आहे....ऐकतो...काळजी नको. बिलकूल नको...करतो....ठेवतो.... हां आताच ... फाडतो ... नवा करतो .... तुमच्या शब्दाबाहेर कसा जाईन ? ठीक ... गुडनाईट ... गुडनाईट !

थोरात : ( हळूच ) सकाळ आहे सर ... गुड मॉर्निंग .... गुड मॉर्निंग ...

गावडे : ( फोन आपटत ) थोरात, या नोटांवर तुमचे ठसे आहेत...पैसे खाता ? डिसमिस व्हाल .... डिसमिस ....

[ थोरात घाबरून नोटा झटकून टाकतो...नि रडवेल्या चेहऱ्याने. ]

थोरात : नो सर .... नो नो ! माझा काही गुन्हा नाही ... मी ... मी काही नाही केलं....

गावडे : ( शांतपणे ) थोरात, कर्ता करवता वर आहे. आपण फक्त गुलाम. घाबरू नका. तुम्ही असं करा.

थोरात : ( अजीजीने ) काय करू साहेब ?

गावडे : हा पंचनामा फाडून टाका. नवा करा नि चार्जशीट भरा.

थोरात : चार्जशीट भरायची ? कोणावर ? कशाबद्दल ?

गावडे : ह्या भिक्यावर. तीन खून केल्याबद्दल.

थोरात : ( आश्चर्याने ) पण सर, अजून आपण त्याची धड चौकशीसुद्धा केलेली नाही.

गावडे : गरज नाही.

थोरात : पण सर, हा गुन्हा होईल.

गावडे : उघडकीला आला, तर ...

थोरात : पण सर, निर्दोष माणूस फाशी गेला तर पाप आपल्या माथी येईल.

गावडे : आपल्या माथी नाही. कोर्टाच्या माथी जाईल.

थोरात : म्हणजे ?

गावडे : थोरात, कोर्टाचं काम काय ?

थोरात : न्याय देणं.

गावडे : करेक्ट ! आणि आपलं काम ?

थोरात : कोर्टापुढं गुन्हेगार उभा करणं.

गावडे : गुन्हेगार नाही. आरोपी उभा करणे. आपण उभा करू तो आरोपी गुन्हेगार असलाच पाहिजे असं नाही. आणि निर्दोष आरोपी फासावर चढवला तर ते पाप कोर्टाच्या माथी...

थोरात : पण साहेब, एखाद्या गरिबाला फाशी पाडण्याऐवजी दाजीसाहेबालाच सस्पेक्टमध्ये का नाही बंद करत ?

गावडे : थोरात, घुशींनी भिंती पोखरायच्या असतात, डोंगर नाही. आपण क्षुद्र उंदीर – घुशी ... तर दाजीसाहेब सत्तेचा डोंगर.

थोरात : पण या डोंगराखाली एक अश्राप माणूस चिरडला जातोय साहेब.

गावडे : काही सांगता येत नाही थोरात, जे नशीब त्याला भरडून काढतंय तेच कदाचित त्याला तारून नेईल ...

थोरात : कसं ?

गावडे : समजा, बाप्पाजीसारखा एखादा बडा वकीलच त्याच्या बाजूने उभा राहिला तर ?

थोरात : बाप्पाजीसारखा ?

गावडे : कैक केसेस फुकट लढवल्यात त्यानं ... डोंगरच काय आकाश पेलेल असा माणूस बाप्पाजी ... पण ... पण ...

थोरात : पण काय सर ?

गावडे : पण दाजीसाहेबांच्या उपकाराच्या ओझ्याखाली दबलेला आहे.

थोरात : सर एवढा मोठा माणूस उपकाराच्या ओझ्याखाली दबून जाईल ?

गावडे : जगात काही सांगता येत नाही, थोरात. जगात काही सांगता येत नाही. समुद्राला ओहोटी लागते. सूर्यालाही खळं पडतं. बाप्पाजी तर माणूसच... माणूस.

♠ ♠

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
अ. क्र. २०५६२ नों. दि. १८/१०/८२
वि. नाटक क्र. ........

## अंक पहिला : प्रवेश तिसरा

[ दुपारची वेळ. बाप्पाजी आपल्या बेडरूममधून खाली येत आहे. हातात पेपर. दिवाणखान्यात त्यांची मुलगी बाबी चहा तयार करते आहे.]

बाप्पाजी : माणूस ... माणूस केव्हा काय करील सांगता येत नाही. व्हेरी डेंजरस... व्हेरी डेंजरस ॲनिमल. भलं मोठं खुनी डोकं असलेला.

बाबी : काय वाचताय बाप्पाजी ?

बाप्पाजी : काय वाचतोय ? बातमी. हाऊ इंटरेस्टिंग ! व्हेरी इंटरेस्टिंग ! बाबे, सकाळी उठल्या उठल्या अशी सनसनाटी बातमी वाचायला मिळाली की, वकील झाल्याचं सार्थक वाटतं.

[ कोचावर बसत फोन उचलतो. ]

बाबी : बोलण्यात थोडी चूक झाली बाप्पाजी. सकाळ नाही, चक्क दुपारचे दोन वाजलेत. इव्हनिंग पेपर वाचताय तुम्ही.

बाप्पाजी : ( डायल फिरवीत ) असं म्हणतेस ? ठीक आहे. चुकीची दुरुस्ती करतो. बाबे, दुपारी उठल्या उठल्या अशी सनसनाटी बातमी वाचायला मिळाली की वकील झाल्याचं सार्थक वाटतं. ( फोनवर ) हॅलो ... सिव्हिल हॉस्पिटल ? डॉक्टर राण्यांना फोन द्या.

बाबी : ( चहा ठेवत ) बाप्पाजी, काय चालवलंय काय अलीकडे तुम्ही ? पिण्याला, पत्ते कुटण्याला काही सुमार ? डॉक्टरांनी सांगितलंय ना दुसरा ॲटॅक होता म्हणून.

बाप्पाजी : बिलकूल नाही.

बाबी : मग काय सांगितलंय ?

बाप्पाजी : ( हसत हसत ) फक्त तिसरा अ‍ॅटॅक यायचा बाकी आहे. नंतर मग एकदम श्रीयुत बाप्पाजींचा कैलासवासी बाप्पाजी ....

बाबी : हसण्यावारी नेताय बाप्पाजी ?

[ बाप्पाजी एकदम खोखो हसतो....नि फोनवर बोलू लागतो. ]

बाप्पाजी : अ‍ॅ ह्यॅ... कोण डॉक्टर राण्याका ? ....लेका, बोंबलत होतास ना .... पोरांना शिकवायला डिसेक्शनसाठी सुद्धा बेवारशी प्रेत नाही मिळत .... वर ऐकत होता बघ तो ... घे लेका घे .... आता एकाच वेळी तीन तीन ताजे नरदेह .... ( बोलता बोलता गंभीर होत. ) घाव किती आहेत ? .... भोसकलंय का फाडलंय ? .... फाडलंय ? .... आतडी ? ....बाहेर आहेत....? पातं किती इंची ? ....पाऊण ? म्हणजे रामपुरी.... तुला सांगतो राण्या, धंदेवाईक गुंडाचं काम आहे हे! मुलीला कुठं मारलंय ? मानेवर ? .... घाव कसा आहे— उभा आहे की आडवा ? .... आडवा ? माझा प्रथमदर्शनी अंदाज असा, मुलीवर घाव अंधारात घातला असावा.... किंवा मुलगी टेबलावर बसलेली असावी .... रिपोर्ट काय ! .... ब्लड ....अस्सं ..लिहून घे....खून मध्यरात्री बारा ते एकच्या दरम्यान झाला असावा.... ( पुन्हा खोखो हसत ) लेका, तू सर्जरीचा डॉक्टर असशील....मी पोस्टमार्टमचा डॉक्टर आहे. तुझ्या आजा-पणज्यांनी केलेले पोस्टमार्टम....खोट्याचे खरे ..खऱ्याचे खोटे केले आहेत मी.. इमर्जन्सी ? ऑपरेशन थेटर ? ठीक आहे....संध्याकाळी ये... येताना एक बाटली घेऊन ये .. मी इकडे दोन कोंबड्यांचं सोलं करून ठेवतो ..ये...

[ फोन ठेवतो ]

बाबी : एवढी काय सनसनाटी न्यूज आहे बाप्पाजी ?

बाप्पाजी : पेपर नाही वाचलास ? प्रेमपत्र वाचत बसली होतीस ? साला अंगठा-बहाद्दर दाज्याचा कार्टा सहा सहा पानी लव्हलेटर लिहितो ?

बाबी : ( फणकारात ) माझ्या पत्रांच्या तुम्हाला कशाला चौकशा ? आधी न्यूज सांगा

बाप्पाजी : न्यूज अशी की, भर वस्तीत भर मध्यरात्री एक तरुण, त्याची सुंदर बायको आणि त्याची गोड कोवळी छोकरी यांचा निर्घृण खून झाला.

बाबी : आई ग...! बाप्पाजी, ही एवढी भीषण बातमी तुम्हाला इंटरेस्टिंग वाटते...?

बाप्पाजी : हंड्रेड परसेंट येस! बाबे, बातमी भीषण आहे म्हणून इंटरेस्टिंग नाही... बातमी इंटरेस्टिंग आहे...कारण हा निश्चितच पोलिटिकल मर्डर आहे...

बाबी : मर्डर काय, पोलिटिकल मर्डर काय ... फरक काय दोघांत ?

बाप्पाजी : खूप फरक आहे बाबे ... खूप फरक आहे ... बाबे, खून सामान्य असला ना की खरा खुनी सापडतो, जन्मठेपेवर नाही तर फासावर चढतो. या असल्या पोलिटिकल मर्डरमध्ये मात्र, खरा खुनी बाहेरच राहतो. आणि कुणी गरीब बिचारा विनाकारण लटकावला जातो ... हे बघ बाबे, एकालाच आरोपी म्हणून पकडलंय. म्हणजे निश्चितच भानगड. हाडाचा वकील आहे बाबे, तू लिहून घे...हे दोघा, नाही तर तिघांचं काम आहे. एकाचं नाही...

बाबी : बाप्पाजी, तुमचा काय अंदाज ? कोणी केले असतील हे खून ?

बाप्पाजी : कोणीही असतील ... अगदी तुझ्या सासऱ्याने सुद्धा !

बाबी : ( लटक्या रागाने ) बाप्पाजी, जिभेला काही हाड ?

बाप्पाजी : चेष्टा केली ग बाबे ! बाबे, एक तर हा दाज्या कधी कुणाला मारेल असं वाटत नाही, कारण माहीत आहे ?

बाबी : काय ?

बाप्पाजी : कारण, दाज्याचं स्वतःचं असं एक तत्त्वज्ञान आहे. त्याचं म्हणणं असं, माणूस मारला की हुतात्मा होऊन डोक्यावर बसतो. पण जर विकत घेतला तर गुलाम होऊन पायाशी बसतो. राजकारणी पुढाऱ्यांसाठी चांगलं काय ? डोक्यावर बसलेला हुतात्मा की पायाशी लोळणारा गुलाम ?

बाबी : ऑफकोर्स गुलाम ?

बाप्पाजी : आणि या उप्परही बाबे, दाज्याने पाडलेच असतील हे खून तर सारी अक्कल पणाला लावून त्याला सोडवीन ... आणि हुंड्यापोटी फीही माफ करीन...

बाबी : काही जरुरी नाही. असला खुनी माझा सासरा असला तरी सरळ नेऊन फासावर चढवला पाहिजे ...

बाप्पाजी : मनापासून ? अगदी खरं ?

बाबी : तुमची शपथ, अगदी खरं.

बाप्पाजी : त्या दाज्याच्या कार्ट्यापुढं—साहेबरावापुढं—बोलून दाखव ना असं !

बाबी : हॅट !

[ लाजून पेपर ओढते नि वर जाऊ लागते. ]

बाप्पाजी : ए, सहा पानी असला तरी पेपरच तो ...
बाबी : तोच वाचतीय... ( पेपर चाळता चाळता गंभीर होते...तिच्या हातातला पेपर गळून पडतो ... ती एकदम खाली बसून ओक्साबोक्शी रडू लागते. ) सुमी ... बाप्पाजी, सुमी ... सुमीचा खून झाला.
बाप्पाजी : कोण सुमी ?
बाबी : माझी क्लास-मेट !

[ अंधार ... हळूहळू पूर्ववत प्रकाश. बेल वाजते. बाबी दरवाजा उघडते. समोर मळक्या कपड्यामधला मास्तर उभा असतो. बाबी त्याला बाहेरच उभा करत तिरस्काराने विचारते. ]

बाबी : कोण तुम्ही ? काय काम आहे ?
मास्तर : मुली, अंगावर कपडे मळके असले तरी माणूस चांगला आहे मी.

[ बाप्पाजी चमकून पाहतो. बाबी वरमते. ]

बाबी : या. आत या. काय काम आहे ?
मास्तर : मला बाप्पाजींना भेटायचंय ( बाप्पाजीला पाहताच ) बाप्पा ... बाप्पा .. ओळखलंत मला ?
बाप्पाजी : ( खिन्नपणे ) मास्तर तू ?
मास्तर : ( आनंदून ) मला वाटलं ओळखतोस की नाही ?
बाप्पाजी : ओळख दाखवायची नव्हती तुला मास्तर. तुझी ओळखच विसरून जायची होती. पण नाही विसरलो ... मास्तर, अंगावरली सुखाची झूल माणूस सहज झटकून टाकतो .... खांद्यावरलं दुःखाचं ओझं मात्र नाही टाकून देता येत त्याला. ये ये. ( मास्तरला हाताला धरून घेऊन येतो. आपल्या शेजारी कोचावर बसवतो. आणि बाबीला ) बाबी, हा मास्तर .... मास्तर म्हणतो आम्ही त्याला ... पण फिलॉसफीची डॉक्टरेट घेतलीय त्यानं. हा माझा अगदी ... अगदी ....
मास्तर : लंगोटीयार म्हणता येत नाही. कारण धड लंगोट्यासुद्धा नव्हत्या आमच्या कमरेला.

बाप्पाजी : तेव्हा हा माझा ... माधुकरी मित्र. अनाथाश्रमात असताना आम्ही पोरं दोघंही जोडीनं माधुकरी मागायला जायचो. 'ओम भवति भिक्षां देही.'

मास्तर : कधी झोळीत शिळी बाजरीची भाकरी आणि कोरडं पिठलं पडलं.... की हा नियम मोडून एकटाच...

बाप्पाजी : ( त्याला थांबवून ) मास्तर मास्तर, उगाच खपल्या काढू नकोस. आतल्या जखमा अजूनही ओल्या आहेत. भळाभळा वाहायला लागतात ....

मास्तर : म्हणून मला टाळत आलास ?

बाप्पाजी : ( आवेगाने ) तुला नाही मास्तर. त्या आठवणींना .... मास्तर, अरे पोलिसांचा तब्बल चार दिवस आणि चार रात्री मार मार मार खाल्ला मी .... पण हूं का चूं नाही केलं ... तुझा पत्ता नाही त्यांना दिला ... वकिलीची सनद मिळाली त्याच दिवशी तुम्हा बावीस जणांचं वकीलपत्र घेऊन दोन वर्षं एकटा लढलो मी. तुम्हाला सोडवलं. जेव्हा तुमचं वकील-पत्र घ्यायलासुद्धा कोणी तयार नव्हतं.

मास्तर : आठवतंय मला बाप्पा .... जितके दिवस तू चळवळीत होतास .. सर्वस्वासकट होतास....

बाप्पाजी : हो होतो.... आणि त्या बदल्यात मी घेतला .... औषधावाचून मेलेल्या बायकोचा एक फोटो आणि लाचार बापाला पोरीच्या दुधासाठी मिळालेले दोन मिल्क पावडरचे डबे ( भानावर येत सावरत ) फरगेट इट . फरगेट इट...बोल, आज कसा काय उगवलास ?

मास्तर : कसा उगवलो ? बाप्पा, मन नाहीतरी आता शरीर थकलंय.

बाप्पाजी : चांगलं झालं. ह्या आदिवासींना मरू देत तिकडे जंगलात. तू आता इकडे ये. माझ्याकडे राहायला... पोरगी सासरी जाणार आहे. मला देखील कोणाची तरी सोबत हवीय.

मास्तर : नाही बाप्पा... उभं आयुष्य ज्यांना गुलामीतून, वेठबिगारीतून सोडवण्यात घालवलं ना .... त्यांच्यात जीव जखडलाय.

बाप्पाजी : मग काय ठरवलंयस ....?

मास्तर : ठरवलं नाही सुरुवात केलीय. म्हटलं आपण आपली लढाई लढलो. तरुणांना त्यांची लढाई लढू दे. आपण फक्त त्यांना घडवूया....शिकवूया ....बाप्पा, माझ्या आदिवासी पोरांसाठी मी शाळा सुरू केलीय.... शाळा भरवतो. माळावर, झाडाखाली. पावसाळा तोंडावर आलाय बाप्पा . पोरांसाठी झापाचं का होईना छप्पर बांधायचं म्हणतोय मी.

बाप्पाजी : झापाचं कशाला ? चांगलं कौलारू बांध.

मास्तर : ( हसून ) अरे, झापाचं छप्पर बांधायलाच झोळी घेऊन हिंडतोय मी .. पक्की कौलारू इमारत कशी बांधू ?

बाप्पाजी : पक्क्या इमारतीला किती खर्च येईल ?
मास्तर : चार खोल्यांसाठी तीसेक हजार रुपये...
बाप्पाजी : बस्स ! चल मी दिले.
मास्तर : ( थक्क होत ) तू ? तीस हजार रुपये देणार बाप्पा !
बाप्पाजी : आश्चर्य वाटलं ? मास्तर या काळजात जितकं दुःख साठलंय ना त्यापेक्षा जास्त या खिशात पैसा साठलाय .... आणि दुःखासाठी नाही तरी पैशासाठी वाटेकरी शोधतोय मी.
मास्तर : बोलायला चुकलास तू बाप्पा ... पैशाला असतात ते वारसदार आणि दुःखाला असतात ते वाटेकरी ....
बाप्पाजी : सुभाषित सुंदर आहे....शाळा बांधल्यावर भिंतीवर ते लिहून ठेव. म्हणजे मुलांच्या ते कधी उपयोगी पडायचे नाही. ( दोघेही हसू लागतात. ) बरं, मास्तर तू जेवलास की नाहीस ?
मास्तर : बाप्पाजी, पाच घरं हिंडून भिक्षा घेतल्याशिवाय जेवायचं नाही ....
बाप्पाजी : हे बघ, भिक्षा मी घातलीय.
मास्तर : ते राहू दे. तुझं काय चाललंय ?
बाप्पाजी : माझं ? आयुष्यभर मर मर मेलो. आता जग जग जगतोय. भोग भोग भोगतोय. वर्ष झालं, वकिली बंद केलीय. आता खातो पितो. हिंडतो फिरतो. सर्व प्रकारचा स्वैराचार करत शेवटच्या ॲटॅकची वाट पाहतोय.
मास्तर : तुला दोन ॲटॅक येऊन गेलेत ?
बाप्पाजी : डॉक्टरने शेवटचाच यायचा बाकी म्हटलं. तेव्हा माझे डोळे उघडले. विचार केला. बालपण भीक मागण्यात, तारुण्य लढण्यात, प्रौढपणा पैसा कमावण्यात घालवलं. आयुष्य भोगलं केव्हा ? मास्तर, मग मी रॅशनली विचार केला. देहाची राख झाल्यावर पुनर्जन्म नाही. तेव्हा जे काही भोगायचं आहे ते भोगून घे .... वेळ थोडाच ... दवडू नकोस ... लगेच वकिली बंद केली. ताळतंत्र सोडला. लोक बडबडतायत, म्हातारचळ लागलाय म्हणून.

[ तोच बेल वाजते ... बाबी खाली येऊन दरवाजा उघडते. ]

बाबी : बाप्पाजी कुणी बाई आलीय तुमच्याकडे.
बाप्पाजी : येऊ दे, येऊ दे. तसा अजून तरुण आहे मी ...

[ बाबी संपूर्ण दरवाजा उघडते ... नि भिक्याची बायको सावित्री कासावीस झालेली आत येते. ]

सावित्री : बाप्पाजी ... गरिबाला तुमच्याशिवाय कोणी वाली नाही.

बाप्पाजी : मागं हट, मागं ... गालिचा खराब होईल ... चिखलाने बरबटलेले पाय तुझे. ( सावित्री मागे सरते. ) हं, बोल आता, बोल !

सावित्री : बाप्पाजी ! माझं कुंकू आता तुमच्या हातीय ....

बाप्पाजी : ( बारमधून बाटली काढत ) हे बघ, माझ्या हाती फक्त बाटली आहे .... काय सांगायचं, बोलायचं ते लवकर बोल, उगाच नाटक, तमाशा नको.

सावित्री : बाप्पाजी, माझ्या धन्याला पकडलंय.

बाप्पाजी : कशासाठी ?

सावित्री : खून केले म्हणून, आळ घालून ...

बाप्पाजी : कशाला खून केले त्याने ?

सावित्री : ( कळवळून ) खून नाय वो केले !

बाप्पाजी : ( थंडपणे ) प्रत्येक खुनी असंच म्हणतो.

सावित्री : माझ्या लेकराची आण ... माझ्या कुंकवाची शपथ ... त्यांनी खून नाय केलं वो ...

बाप्पाजी : मग कशाला पकडलं पोलिसांनी ?

सावित्री : अन्याव केलाय पोलिसांनी. मोठा अन्याव. तिघांना मारलं, म्हणून बेड्या ठोकल्या हाती. धिंड काढली वस्तीमधनं.

बाप्पाजी : ( चमकून ) तिघांना ? कोण तिघं ?

[ मास्तर आणि बाबी सावित्रीकडे पाहू लागतात. ]

सावित्री : आमचं मालक, गर्जनाचं संपादक, लयी देवमाणूस.

बाप्पाजी : तरी त्याचं घरदार बरबाद केलं तुमच्या नवऱ्यानं ?

सावित्री : नाय वो बाप्पाजी ! ज्याचं मीठ खाल्लं त्याला ... जिला अंगाखांद्यावर खेळवली त्या लेकीला माराया कसायाचा बी हात नाय उठायचा.

बाप्पाजी : मग तुझ्या नवऱ्याचा हात कसा उठला ?

सावित्री : बाप्पाजी, आळ हाय, गरिबावर आळ हाय. माझ्या धन्याचा हात उठता तर म्यांच माझं कुंकू पुसलं असतं .. भीक नसती मागितली तुमच्याकडं.

बाप्पाजी : काय भीक घालू तुला मी ?

सावित्री : माझ्या धन्यासाठी कोर्टात उभं ऱ्हावा.

बाप्पाजी : बाई ! वर्ष झालंय मी वकिली बंद केलीय. आता फक्त एखादीच केस मी लढवीन म्हणतो.

सावित्री : कोणची !

बाप्पाजी : जी मला जास्तीत जास्त फी देईल. कोणत्याही वकिलाला केव्हाही मिळाले नाहीत एवढे पैसे जी मला देईल ....

सावित्री : ( सावित्री पदराचे ,गाठोडे सोडत ) हाय नाय ते तुम्हाला देते बाप्पाजी!

[ बाप्पाजी चांदी, कथलाचे दागिने पाहून हसतो. ]

बाप्पाजी : बाई, एवढे पैसे मला एका वेळच्या दारूला पुरत नाहीत. एवढ्यासाठी लढणं मला कसं परवडायचं ?

सावित्री : गरीब बाय हाय म्या बाप्पाजी. तीन लेकरांची आई हाय. पैशासाठी नाय तर माझ्या कुंकवासाठी ... माझ्या लेकरांसाठी माझ्या धन्याचं वकील व्हा ... गरिबावर लय अन्याव होतोय वो!

बाप्पाजी : हे बघ बाई, हरघडी हररोज हरेकावर अन्याय होतो. प्रत्येक अन्याया-विरुद्ध लढण्याचा मी मक्ता घेतलेला नाही. चल जा. दुसरा कोणी वकील पाहा.

सावित्री : कोण बी केस घेत नाय वो.

बाप्पाजी : घेईल. कोणी तरी घेईल. अगं जितका बदनाम आरोपी तितका नामवंत वकील. पैशासाठी नाही, तरी नावासाठी कोणीही वकील केस घेईल.

सावित्री : बाप्पाजी, तुम्हीच.

बाप्पाजी : हे बघ, मला नाव, पैसा काहीही नकोय. खूप आहे माझ्याकडे. जा, चल नीघ. ( तिला हाताला धरून उठवतो. ) हे बघ, तुझ्याविषयी खूप वाईट वाटतं मला. हे घे शंभर रुपये ( नोट देतो. ) दुसरा वकील गाठ मला नाही काम करता यायचं.

[ सावित्री खिन्न मनाने निघते. बाप्पा ग्लास भरतो. मास्तर झोळी खांद्याला लावून उठतो. बाबी दोघांकडे एकटक पाहात जिन्यावर बसून आहे. ]

मास्तर : बॅरिस्टरसाहेब, आता आपली रजा घेतो.

बाप्पाजी : का रे, जेवून नाही घेत ?

मास्तर : बॅरिस्टरसाहेब, आपल्याला कदाचित माहीत नसेल, पण, बेचाळीसच्या चळवळीत भूमिगत होतो, तेव्हापासूनच माझा एक पण आहे. मी एकट्याने कधी जेवत नाही. आणि अपरिचित माणसांबरोबरही जेवत नाही.

बाप्पाजी : ( हसून ग्लास तोंडाला लावत ) मास्तर, तुझ्या या निषेधाचा काही उपयोग नाही. हा ग्लास खाली ठेवला जाणार नाही तुला चालतं व्हायचंय ? चालता हो ... बाबे, चेक-बुक आण ...

मास्तर : आपल्या दातृत्वाबद्दल आभारी आहे बॅरिस्टरसाहेब. पण तुमचा चेक मला नको.

बाप्पाजी : ( चमकून ) का ?

मास्तर : कारण मी जे काही काम करतो, ते गोरगरीब, आदिवासी मुलांचं कल्याण व्हावं म्हणून ! श्रीमंतांना चार दिडक्यांना पुण्य खरेदी करता यावं म्हणून नाही.

बाप्पाजी : मास्तर, माझा अपमान करतोयस तू.

मास्तर : नाही. मी फक्त स्वतःच्या कार्याचा सन्मान ठेवतोय.

बाप्पाजी : मास्तर, तुला काय वाटतं ? खरंच हा कोण जो भिक्या आहे, तो निर्दोष असेल ?

मास्तर : ( आवाज चढवून ) समजा तो दोषी आहे. त्याने, त्यानेच ते तीन खून केलेत. पण पन्नास हजार रुपये फी घेऊन ती बाई आली आहे ... तर मग ?

बाप्पाजी : ( गडबडून ) तर मग ... तर मग ... अजून नक्की विचार केला नाही मी ...

मास्तर : कारण नोटांचा गल्ला समोर नाहीय तो असता तर, तुम्ही सांगितलं असतं ... गुन्हेगारालाही बचावाची पूर्ण संधी मिळालीच पाहिजे.

बाप्पाजी : तू ... तू मला कायदा शिकवतोस मास्तर ?

मास्तर : छे, छे, बॅरिस्टरसाहेब, तुम्ही तर प्रख्यात कायदेबाज ! .... कायद्याच्या कोणत्याही कलमावर बोट ठेवू शकता. दुःख इतकंच .... छातीठोकपणे काही बोलू शकत नाही. तरी तुम्ही दुसऱ्याला गीतेवर हात ठेवून बोलायला सांगता .... वा .... ! वा रे तुमचा न्याय !

बाप्पाजी : मास्तर ... तू, तू मला न्याय शिकवतोयस ?

मास्तर : हो मी. आणि फक्त मीच तुम्हाला न्याय शिकवू शकतो. मी....मीच तुम्हाला सांगू शकतो, की या भिक्याला बचावाची संपूर्ण संधी मिळाली पाहिजे. याच्यावर जी मुलगी मारल्याचा आरोप आहे, ती . ती मुलगी माझी होती. ती नात माझी होती. तो जावई माझा होता.

[ बाप्पाजी दगडवत होऊन जमिनीला खिळतो. बाबी ताड्कन उठून उभी राहते .... मास्तर सरळ निघून जातो. ]

बाप्पाजी : मास्तर ! पट्टे सर्वस्व हरवून बसलास तरी दुपारी झोळी घेऊन हिंडतोयस ? अरे, पोस्टमार्टेम संपलं असेल .... अरे, प्रेत ताब्यात घेण्यापुरते तरी तुझ्याकडे पैसे आहेत ?

[ बराच वेळ सुन्न वातावरण. डबडबलेल्या डोळ्यांनी बाप्पाजी बाबीकडे वळतो. ]

बाप्पाजी : बाबे, वर जाऊन माझा काळा कोट आण !

बाबी : खरंच बाप्पाजी ?

बाप्पाजी : आणि खणात एखादं वकीलपत्र आहे का ते पाहा.

बाबी : बाप्पाजी, तुम्ही कोर्टात जाणार ? खरंच वकीलपत्र आणू ?

बाप्पाजी : हां बाबे. आण तर ते वकीलपत्र. कसं असतं ते पुन्हा एकदा पाहतो ... आयुष्यभर अशिलासाठी झगडलो. एकदा तरी न्यायासाठी लढतो.

[ सर्वत्र अंधार पसरतो. ]

# अंक दुसरा : प्रवेश पहिला

[ पडदा उघडतो. सावित्री दीनवाणीपणे हात जोडून उभी आहे. आणि वरून बाप्पाजी खाली येतो. ]

सावित्री : बाप्पाजी, तुमचा सांगावा भेटला न् लगूलग आले.

बाप्पाजी : हां, तुला निरोप अशासाठी पाठवला. कोणी वकील भेटला की नाही तुला ?

सावित्री : नाय ... कोन बी न्हाय !

बाप्पाजी : अगं असं कसं होईल ? एवढ्या भानगडीच्या केससाठी दहा वकील पुढं होतील. वर तुला पैसा देऊन वकीलपत्र घेतील ... धंदा आहे हा. वकिलाची जाहिरात होते तेवढीच.

सावित्री : दोन-चार काळं कोटवालं आलं. केस पाह्यली नि तोंड काळं करून गेलं.

बाप्पाजी : का ?

सावित्री : दाजीसाहेबांनी भाषण केलं परवा दिशी ... जो वकील ही केस घील ... घिऊ नका म्हणाले.

बाप्पाजी : ( थबकत ) दाजीसाहेबांनी भाषण केलं ?

सावित्री : हां. त्यांची दावेदारी होती आमच्या मालकांशी.

बाप्पाजी : कशासाठी ?

सावित्री : काय की बा ? काय तरी बी छापू नगं असं म्हणत व्हते ते.

बाप्पाजी : काय छापू नको म्हणत होते ?

सावित्री : कुणास ठावं. छापू नको म्हणत होते. पैसे बी देत व्हते. आमच्या मालकांनी घेतलं न्हायती.

बाप्पाजी : अगं, पण काय छापू नको म्हणत होते ?

सावित्री : मला कुठं लिवता वाचता येतं बाप्पाजी. पण, कालीज ... साखऱ्या... गेलं इलेक्शन नि .... खरंच काय तरी व्हतं. मला कुठं वाचता येतं ?

बाप्पाजी : बरंच काही तरी होतं ? हे तुला बरं ग माहीत ?

सावित्री : धा वर्षं राबतीया मालकांच्या घरी ! उमगत न्व्हतं, तरी ठावं पडत होतं ... त्येंचं आणि दाजीसायबांचं वैर बनलं होतं.

बाप्पाजी : ( वरकरणी हसत बेफिकीरपणे ) चला, चांगली गोष्ट आहे ! मालकांची आणि दाजीसाहेबांची दावेदारी होती, म्हणजे तुझ्या धन्याविरुद्ध दाजीसाहेब काय करणार नाहीत ? उलट मदत करतील. काय ग, तुझ्या धन्याला किती पैसे कबूल केले होते दाजीसाहेबांनी ?

सावित्री : कशापायी ?

बाप्पाजी : तुमच्या मालकाला मारण्यासाठी.

सावित्री : बाप्पाजी गरिबावर आलेला आळ हाय हा. झालेला अन्याव हाय हा.

बाप्पाजी : ( विश्वासात घेत ) हे बघ बाई, नाव काय तुझं ?

सावित्री : सावित्री.

बाप्पाजी : हां, तर सावित्री; तुझ्या नवऱ्याची केस मी घेतो. सोडवतो त्याला. पण खरं खरं सांग ... वकिलापासनं आणि डॉक्टरपासनं काही लपवू नये.

सावित्री : ठावं हाय, ते समधं सांगितलं तुमास्नी.

बाप्पाजी : कुठं सांगितलंयस ? खून झाला तेव्हा तुझा नवरा कुठं होता ?

सावित्री : धा डाव सांगितलं .... आणिक धा डाव सांगते .... माझ्या संगटच व्हते माझे धनी, घरलाच.

बाप्पाजी : अगं, पण तुझ्या शब्दावर कोर्ट कसा विश्वास ठेवेल ?

सावित्री : म्यां खरं सांगतिया. मग का न्हाय इस्वास ठेवणार ?

बाप्पाजी : हे बघ बाई, कोर्टामध्ये सत्याला पुरावा आणि असत्याला संशयाचा फायदा असावा लागतो.

सावित्री : पन म्यां लेकरांची आन घेते.

बाप्पाजी : अग, कोर्टामधे गीतेची खोटी शपथ घेतली तरी चालते, लेकराची खरी शपथ घेतली तरी चालत नाही.

सावित्री : पर आमचा निवाडा कराया तुमी हायसा की ...

बाप्पाजी : निवाडा नाही ... मी वकिली करायला उभा आहे ! आणि वकिलानं नेहमी खऱ्याचं खोटं आणि खोट्याचं खरं करायचं असतं. तुझ्या धन्याच्या बाबतीत मी काय करू ?

सावित्री : जे खरं हाय, तेच खरं म्हना. माझा धनी निर्दोष ....

बाप्पाजी : अगं बाई, कसं सांगू तुला ? खऱ्याचं खोटं, खोट्याचं खरं करता येतं, पण सत्य हे सत्यच आहे हे कसं सिद्ध करायचं ? कठीण आहे ... कठीण ...

सावित्री : काय ?

बाप्पाजी : तुझा नवरा निर्दोष सुटणं कठीण आहे ...

सावित्री : निर्दोष असून बी ?

बाप्पाजी : हो. निर्दोष आहे म्हणूनच सुटणं कठीण ! दोषी असता तर सुटला असता बहुतेक. अगं, निर्दोष माणसाला हकनाक गोवतात, तेव्हा ते पक्क्या खोट्यानाट्या पुराव्यानिशी. पढवलेल्या साक्षीदारानिशी गोवतात.

सावित्री : म्हणजे माझ्या धन्याला फास लागणार ? ( रडकुंडीस येते. )

बाप्पाजी : अगं, घाबरू नकोस ! धीर सोडू नकोस. मी आहे ना ! हे बघ, तुझ्या धन्याला फासापासून मी निश्चित वाचवीन. फक्त प्रोव्हेकेशन टू मर्डर सिद्ध व्हायला पाहिजे.

सावित्री : म्हंजे काय कराया हवं ?

बाप्पाजी : काही नाही. मी पढवीन ते तू बोलायचंस. आपण —आपण म्हणजे तू.... कोर्टात असं सांगायचं ... बेधडक, बेलाशक सांगायचं .... तुझ्या मालकांची नजर फार वाईट होती. खून झाले त्या दिवशी तुला नि भिक्याला...तुझ्या धन्याला....ऑफिसवर झाडलोट करायला मालकांनी बोलावलं. रात्र झाली, तशी .... तुझ्या धन्याला मालकांनी स्टेशनवर टपाल टाकायला पाठवलं. भिक्या गेला, नि मालकांनी तुझा हात पकडला .... तुझ्यावर बळजबरी करण्याचा प्रयत्न केला .... ( सावित्री थक्क होऊन ऐकते ) वाटेत मालकीणबाई भेटल्या म्हणून त्यांना व छोट्या बेबीला घेऊन तुझा धनी परत ऑफिसवर आला .... त्यानं तुझ्यावर बळजबरी होताना पाहिलं, नि तो मालकावर धावला. मालकांना वाचवायला बाईसाहेब नि छोटी बेबी मध्ये पडल्या .... झटापटीत त्यांच्यावरही वार झाले ....

सावित्री : असं सांगायचं ?

बाप्पाजी : हो. म्हणजे बाईसाहेबांचा, बेबीचा खून ॲक्सिडेंटल मर्डर ठरेल. नि मालकाचा खून .... प्रोव्हेकेशन टू मर्डरमुळे .... मी सिद्ध करीन .... हां, सिद्ध करीन ....

सावित्री : पर हे सगळं खोटं हाय ....

बाप्पाजी : खोटं आहे .... माहिती आहे मला. पण तुझ्या फायद्याचं आहे.

सावित्री : नाय .... म्यां नाय असं खोटं बोलनार !

बाप्पाजी : का ?

सावित्री : खुन्यांनी फक्त मालकाचा खून केला. म्यां त्यांच्या नावाला, मागं उरल्या नावालाबी डाग लावू ? देव मानूस व्हते ते.

बाप्पाजी : अगं, पण तुझा नवरा मग कसा सुटणार ?

सावित्री : कोरटात न्याय नाय मिळायचा ?

बाप्पाजी : ( खिन्नपणे ) कोरटात ? अग, जगात .... माणसांच्या जगात कुठंही न्याय मिळत नाही.

सावित्री : ( खचून जात ) बाप्पाजी .... जगात फक्त अन्यावच असला तर आम्ही गरीब माणसांनी कसं जगावं .... कशापायी जगावं ? म्यां तुमच्याकडे आले होते माझ्या धन्याला वाचवायला .... माझ्या मालकांच्या खुनाला वाचा फोडाया; त्या देवमाणसाला कोणी कशापायी मारलं ? लक्ष्मी-नारायणाचा जोडा ....त्या लक्ष्मीनं काय पाप केलं होतं ? दूध पितं लेकरू माझं ... त्याची कोणाशी दावेदारी होती ? मला न्याय पायजेल बाप्पाजी.

बाप्पाजी : बाई, न्याय मिळवायला अन्यायाशी लढावं लागतं.

सावित्री : म्यां लढेन. तुमी बी लढा बाप्पाजी.

बाप्पाजी : अगं, पण कशाच्या बळावर ?

सावित्री : म्यां गरीब, अडाणी बाय .. . म्यां माझं कुंकवाचं बळ लावते . . . तुमी तुमची बुकं पणाला लावा.

[ बाप्पाजीवर स्पॉट . . . बाप्पाजी स्वतःशीच पुटपुटतोय. ]

बाप्पाजी : ही . . ही अडाणी बाई ... न्यायासाठी कुंकू बळाला लावते. मला काही जायचं नाही ... तरी पण मला माझी बुद्धी बळाला लावता येत नाही ? शेमफूल ... शेमफूल !

♠ ♠

## अंक दुसरा : प्रवेश दुसरा

[ सायंकाळची वेळ. बाप्पाजी निश्चयपूर्वक केसपेपर चाळत बसले आहेत. बेल वाजते. बाबी पुढे होऊन दरवाजा उघडते. बाहेर; गळ्यात नि हातात हारांचा ढीग घेऊन दाजीसाहेब उभे आहेत. ]

बाबी : अय्या ! दाजीसाहेब तुम्ही ? ( दाजीसाहेब आत येतात. ) दाजीसाहेब, तुम्ही राजकारणातून निवृत्त झालात ?

दाजीसाहेब : निवृत्त व्हायला राजकारण म्हणजे काय वकिली आहे का बाबे ?

बाबी : मग, एवढे हे हार कशाबद्दल ?

दाजीसाहेब : एकसष्ठी साजरी केली जनतेनं माझी.

बाबी : तुमची आज एकसष्ठी होती ?

दाजीसाहेब : नव्हती; पण केली साजरी. निवडणुका जवळ आल्या आहेत ना ?

बाबी : म्हणजे तुम्ही आता म्हातारे झालात ?

दाजीसाहेब : बिलकूल नाही. मी एकसष्ठ वर्षांचा झालो.

बाबी : म्हातारे झालात काय, एकसष्ठ वर्षांचे झालात काय, दोघांत फरक तरी काय !

दाजीसाहेब : ( आत येतात ) खूप फरक आहे बाबे ... खूप फरक आहे ... बाबे, सामान्य माणूस एकसष्ठ वर्षांचा होतो तेव्हा त्याला म्हातारा झाला म्हणतात आणि पुढारी एकसष्ठ वर्षांचा झाला की त्याला वयात आला म्हणतात.

बाबी : ( दाजीसाहेबांच्या हातातले हार घेता घेता ) तर तुम्ही वयात आलात म्हणून एवढे हे हार ! किती प्रकारचे हार तरी हे ? हा चंदनाचा, हा गुलाबाचा हार, हा ...

दाजीसाहेब : यात कोणता साप लपलाय कोणास ठाऊक ?
बाबी : हा नोटांचा हार ?
दाजीसाहेब : तेलातुपांचे भाव काय उगीच नाही वाढत बाबे.
बाबी : हे एवढे फुलांचे हार.
दाजीसाहेब : आम जनतेचा मूर्खपणा.
बाबी : आणि हा सुताचा हार . .
दाजीसाहेब : ( दचकून ) सुताचा हार ? कुठाय ?
बाबी : हा काय तुमच्या गळ्यात ?

[ दाजीसाहेब झटकन हार काढून कोचावर फेकून देतो. ]

दाजीसाहेब : बाबे, जपून बरं . . . जपून. हे सुताचे हारच राजकारणात फासाचे दोर बनतात. ते आपल्या गळ्यात नकोत. असं कर; हा हार बापूजींच्या गळ्यात घाल. . . त्यांनाच शोभून दिसतो तो. ( बाबी गांधीजींच्या तसबिरीला हार घालते . . दाजीसाहेब फोटोला नमस्कार करीत ) मोठा माणूस... फार मोठा माणूस ... नेहमी इतरांना त्यांचा आदर्श सांगता येतो ... आणि स्वतः ठेवला नाही तरी चालतो. बाबीताई, आता लोकांचे हे प्रेम कचऱ्यात नेऊन टाका. नोटांचा हार तेवढा साडीचोळीसाठी ठेवून घ्या.
बाबी : ( हार उचलत ) थँक यू ! काय आणू ? चहा, कॉफी ?
दाजीसाहेब : काहीही आणा. ( बाबी निघते. ) बाबीताई, आमचे चिरंजीव भेटतात का ? साहेबराव ?
बाबी : हो. का ?
दाजीसाहेब : नाही, आमचं तोंड चुकवत असतात सारखे. भेटले की त्यांना निरोप द्या.
बाबी : काय ?
दाजीसाहेब : म्हणावं, उद्या पक्षाच्या सभेला हजर राहा. परवा गर्जना खून खटल्याची चौकशी व्हावी म्हणून धरणं धरायचंय, त्यात सामील व्हा.
बाबी : अहो पण, राजकारणात पडून तो काय करणार ?
दाजीसाहेब : धड शिक्षण घेता आलं नाही. नीट नोकरी-धंदा करता येत नाही. तेव्हा, राजकारणाशिवाय आणखी तो काय करणार ? आम्ही आहोत तोपर्यंतच कुठं तरी आमदार-नामदार व्हा म्हणावं.
बाबी : सांगते.

[ बा निघून जाते. ]

दाजीसाहेब : बोला, बोला बॅरिस्टर बाप्पाजी. काय खबरबात ?

बाप्पाजी : ( रोखून ) खबर अशी दाजी, मी एक केस हाती घेतलीय ....

दाजीसाहेब : फार चांगलं केलंस ! दारू पिणं, पत्ते कुटणं, रात्र रात्र जागरणं करणं याचा जेवढा ताण पडतो त्याच्यापेक्षा केसचा ताण तुझ्यावर कमी पडेल.

बाप्पाजी : पण मी केस कोणती घेतलीय विचारलं नाहीस ?

दाजीसाहेब : भिक्याची ना ? त्यात काय विचारायचं ?

बाप्पाजी : नाही. तूच बार कौन्सिलची सभा घेऊन अशा नराधमाची केस कोणाही वकिलानं घेणं म्हणजे न्यायसंस्थेची चेष्टा आहे असं म्हणाला होतास . . .

दाजीसाहेब : टाळ्यांसाठी. बाप्पा, या लोकशाहीची एक मजा आहे. ज्यांच्यावर राज्य करायचं ना त्यांचीच मनधरणी, अनुनय करावा लागतो भिक्याला भर चौकात फाशी द्या असं लोक म्हणतात. मीही सुरात सूर मिळवून दिला. निवडणुका जवळ आल्यात.

बाप्पाजी : एकीकडे लोकांच्या सुरात सूर मिळवून दुसरीकडे तू न्यायालयीन चौकशीची मागणी करतोस ?

दाजीसाहेब : कारण ती होणार नाही.

बाप्पाजी : न का होईना. तुझा पोलिस तपासावर विश्वास नाही एवढं तर खरं.

दाजीसाहेब : हो. खरं. हा गरीब भिक्या निर्दोष आहे याची मला पूर्ण खात्री आहे. म्हणून तर त्याची केस घेतल्याबद्दल तुझं अभिनंदन करायला आलोय. तसाच एक सल्लाही द्यायला आलोय.

बाप्पाजी : कसला सल्ला ?

दाजीसाहेब : बाप्पा, वकिलाचं काम अशिलाला सोडवणं आहे, गुन्हेगाराला शोधणं नाही. ते काम पोलिसांचं; तू वकिलाचं काम कर, प्रायव्हेट डिटेक्टिव्हचं नको. तुझ्या तब्येतीला ते झेपणारं नाही. जाधवरावची त्याच्या घरात क्रॉस घेऊन, सबइन्स्पेक्टर थोराताला पार्टी देऊन, नाहीतर ऑडिट रिपोर्टस् वाचून, काहीही साधणार नाही.

बाप्पाजी : मी ऑडिट रिपोर्टस् मागवले...थोरात, जाधवरावांची भेट घेतली, हे तुला कुणी सांगितलं ?

दाजीसाहेब : बाप्पाजी, पुढारी व्हायचं म्हणजे नुसता लोकांवर विश्वास ठेवून नाही चालत. लोकांवर नजर ठेवावी लागते, नजर. या शहरावर माझी करडी नजर आहे बाप्पा ! ' जाधवराव ४२० ' असं कॉलेजच्या मुतारीत कोणा पोरानं लिहून ठेवलं आहे, त्याचीसुद्धा यादी माझ्या खिशात आहे. या शहरात घडणारी प्रत्येक गोष्ट मला माहीत असते.

बाप्पाजी : मग सांग. दाजी, ' गर्जना ' खून खटल्यातले खरे गुन्हेगार...

दाजीसाहेब : तुला माहीत नसते तर, जरूर सांगितले असते.

बाप्पाजी : मला कुठं माहीत आहे ? मला तर नुसता संशय...

दाजीसाहेब : होता...तो आता फिटला आहे. बाप्पा, गेले आठ दिवस पडेल ती किंमत मोजून गर्जनाचे जुने अंक तू जमवत होतास.

बाप्पाजी : तुला कोणी सांगितलं ?

दाजीसाहेब : स्टेशनवरच्या जग्या रद्दीवाल्याला पंधरा रुपये प्रत्येक अंकाचे तू दिलेस विचाऱ्याने बेवड्यात उडवले.

बाप्पाजी : आणि त्याच्या बेवड्या मित्रांनी मारल्याने, गेन्याने ही बातमी तुला दिली.

दाजीसाहेब : करेक्ट ! त्या नवशिक्या इन्स्पेक्टर थोरातानं तुला रद्दबातल केलेला पंचनामा आणून दिला...

बाप्पाजी : आणि खाल्ल्या मिठाला जागणाऱ्या लाचार गावड्याने त्याला पैसे खाल्ल्यावरून सस्पेंड केले...

दाजीसाहेब : होय. दोन वर्षांपूर्वी त्यानं टॅक्सीनं फुकट प्रवास करून खात्याकडून सात रुपये प्रवासभत्ता वसूल केला होता...

बाप्पाजी : इतक्या छोट्या गुन्ह्यासाठी त्याला एवढी शिक्षा ?

दाजीसाहेब : बाप्पा, या देशात किरकोळ गुन्ह्यांसाठीच शिक्षा ठोठावल्या जातात...सक्त मजुरीच्या.

बाप्पाजी : मोठ्या गुन्ह्यांच्या फक्त चौकशा केल्या जातात ..आयोग नेमून.

दाजीसाहेब : आणि अशा दोन आयोगांवर तू काम केले आहेस...

बाप्पाजी : ते तू मंत्री असताना. तुझ्या कृपेनं.

दाजीसाहेब : ( हसून पाठीवर थाप टाकत ) तर अशा रीतीने बॅरिस्टर बाप्पाजी सारी कार्डस् ओपन आहेत. सिक्वेन्स कोणता लावायचा बोल.

बाप्पाजी : प्रथम भिक्याला निर्दोष सोडवायचा.

दाजीसाहेब : बरोबर. निष्पाप मनुष्य फाशी जाता कामा नये.

बाप्पाजी : या निष्पाप माणसाचं अन् तुझं काय वैर होतं ?

दाजीसाहेब : अरे, तो काळा की गोरा हे देखील पाहिलं नाही मी. साधा घरगडी तो ...त्याच्याशी मी काय वैर धरणार ?

बाप्पाजी : मग त्याचा बळी कशासाठी ?

दाजीसाहेब : बाप्पा, बळी नेहमी अजापुत्राचाच जातो. बळी बोकडाचाच जाणार, वाघाचा नाही.

बाप्पाजी : असे बळी...

दाजीसाहेब : अटळ आहेत, वाईट वाटतं. पण नाइलाज आहे.

बाप्पाजी : तो नाहक फाशी जाईल ..

दाजीसाहेब : कसा ? तू वकीलपत्र घेतलंयस ना. त्याच्या वतीनं लागेल ती फी मी मोजीन.

बाप्पाजी : उपयोग काय, खोटा साक्षीपुरावा तुम्हीच योजला आहे.

दाजीसाहेब : साक्षीदार पाहिजे त्या अंशात फिरवू. कोणी निष्पाप माणूस हकनाक फाशी जाणं मनाला बरं नाही वाटत.

बाप्पाजी : कोर्टात माझा युक्तिवाद थिटा पडला तर ?

दाजीसाहेब : तुझा युक्तिवाद थिटा पडला तरी माझं वजन छोटं नाही पडणार. स्वतः जाऊन गव्हर्नरला भेटेन. फाशी रद्द करून घेईन.

बाप्पाजी : आणि जन्मठेप देववीन ..

दाजीसाहेब : हो बाप्पा, हा असला कंगाल, खायची वानवा असलेला माणूस, बाहेर राहिला काय, आत राहिला काय ..फरक काय पडणार आहे ? बिचाऱ्याला तुरुंगात निदान दोन वेळा जेवायला तरी निश्चित मिळेल.

बाप्पाजी : आणि बाहेर त्याची बायकापोरं अन्नासाठी टाचा घासत मरतील.

दाजीसाहेब : नाही बाप्पा, नाही. तुला माहीत आहे मी नेहमी दुसऱ्याच्या छातीवर पाय देतो. कोणाच्या पोटावर नाही. तू असं कर, बाप्पा. त्याच्या बायकोला दे पाठवून माझ्याकडे. शुगर फॅक्टरीत चांगल्या तीनशे रुपयांच्या पगारावर लावून घेऊ...

बाप्पाजी : पैशाची खैरात तू कोणावरही करू शकतोस दाजी...पण त्याची पोरं... खुन्याची पोरं, खुन्याची पोरं म्हणून रस्त्यानं चालू शकत नाहीत, की धड शाळेत जाऊ शकत नाहीत.

दाजीसाहेब : आश्रमात पाठवून दे आपल्या. मीच चेअरमन आहे. एकदम डॉक्टर, इंजिनियर, वकील करून बाहेर काढतो.

बाप्पाजी : ( खिन्नपणे ) आईबाप असलेल्या पोरांनी आश्रमात वाढायचं ?

दाजीसाहेब : ( बाप्पाचे खांदे थोपटत ) बाप्पा, म्हातारपणामुळं आणि आजारपणामुळं शाळकरी पोरासारखा भावुक झाला आहेस तू. अरे, खेळात वजिराला वाचवायला प्यादी मारावीच लागतात.

बाप्पाजी : खेळात वजीर कोण आणि प्यादं कोण हे मात्र तू ठरवणार.

दाजीसाहेब : मी नाही, तू. तू ठरवायचंस बाप्पा.

बाप्पाजी : इतका विश्वास आहे माझ्या मैत्रीवर ?

दाजीसाहेब : बाप्पा, मी मैत्रीवर नाही, शक्तीवर विश्वास ठेवतो माझ्या शक्तीवर माझा विश्वास आहे बाप्पा. आणि मला माहीत आहे, मला तू गोत्यात आणणार नाहीस. भिक्याला मात्र अवश्य वाचवशील, त्याला न्याय मिळवून देशील.

बाप्पाजी : थोडा चुकतोस तू दाजी. मी भिक्याला न्याय देण्यासाठी कोर्टात उभा राहिलो नाही. भिक्या निर्दोष सुटल्याने न्याय मिळणार नाही.

दाजीसाहेब : मग, न्याय केव्हा मिळेल ?

बाप्पाजी : न्याय तेव्हा मिळेल, जेव्हा गर्जनाच्या संपादकाचा कोणी, का बळी घेतला हे कळून त्याला शिक्षा होईल तेव्हा.

दाजीसाहेब : खून कोणी केले, हे तुला माहीत आहे ?

बाप्पाजी : ( उसळून ) खून कोणी केले याला महत्त्व नाही. कोणी करवले याला महत्त्व आहे दाजी. लढणारे सैनिक फक्त युद्धकैदी होतात. लढाई घडवणारेच खरे युद्धगुन्हेगार असतात.

दाजीसाहेब : बाप्पा, तुझ्या बोलण्याचा रोख...

बाप्पाजी : तुझ्याकडेच. जर दाजी, तुझ्या इच्छेविरुद्ध हे खून झाले असते तर तू दोन सराईत गुंडांना आपली माणसं म्हणून निश्चित संरक्षण दिलं नसतंस.

दाजीसाहेब : नसतं दिलं. निश्चित नसतं दिलं. आणि आत्ताही मी त्यांना संरक्षण देत नाहीय, स्वतःचं रक्षण करतोय.

बाप्पाजी : आणि त्यासाठी, एका गरिबाचा बळी घेतोयस.

दाजीसाहेब : बाप्पा, राजकारणात असं रक्त सांडावं लागतं.

बाप्पाजी : सांडावं लागतं ? दाजी, तू आत्ता ज्या महात्म्याला हार घातलास ना, तो म्हणाला होता ' रक्तच वाहवायचं असेल तर स्वतःचं वाहवा. '

दाजीसाहेब : तो महात्मा होता. माझ्यासारखा नामदार नव्हता. तो गोळी खाऊन मेला. मला नाही तसं मरायचं. बाप्पा, मला कळतंय तुला सात्त्विक वगैरे जो काय म्हणतात तो संताप आलाय. पण असं क्रौर्य राजकारणात अटळच. कोण गरीब आहे, कोण निष्पाप आहे ते पाहायला ह्या क्रौर्याला वेळ नाही.

बाप्पाजी : अगदी तसंच, अगदी तसंच ! दाजी, गुन्हेगार हा मित्र आहे का नातेवाईक हे पाहायला न्यायदेवतेला डोळे नसतात. ती आंधळी असते.

दाजीसाहेब : उगाच न्यायाच्या गप्पा मारू नकोस बाप्पा ! अरे न्यायासाठी नुसती वकिली करून नाही चालत. लढावं लागतं, लढावं. तू लढू शकतोस माझ्याशी ?

बाप्पाजी : का ? शंका वाटते ?

दाजीसाहेब : नाही काळजी वाटते...आधीच तुला दोन अॅटॅक येऊन गेलेत...

बाप्पाजी : अंहं...मी दोन अॅटॅक परतवलेत...

दाजीसाहेब : पण तिसरा नाही परतवता यायचा. बाहेरच्या शत्रूशी लढणं सोपं असतं बाप्पा. पण स्वतःच्या मित्रांशी नाही. आपले इतक्या वर्षांचे मैत्रीचे संबंध...

बाप्पाजी : मैत्रीचे संबंध नाही, हितसंबंध. परस्परांच्या हितासाठी राखलेले संबंध.

दाजीसाहेब : हो. आणि हे असेच राहण्यात आपल्या परस्परांचे हित आहे.

बाप्पाजी : आत्ता मला स्वतःचं कसलंही हित साधायचं नाही.

दाजीसाहेब : नको साधूस; पण अनहित नको करूस. बाप्पा, पापाच्या जंगलात राहून

पापाची मुळं नाही खणता येत. कारण त्या मुळांतच तुमचे पाय कुठेतरी अडकलेले असतात. विसरू नकोस, गेली वीस वर्षे आपण जोडीने वाटचाल करत आलो...

बाप्पाजी : पण तुझ्यासारखी बेकायदेशीर कृत्यं नाही मी केली...

दाजीसाहेब : ( उपहासाने ) कायदा...बाप्पा ! उघड्यानागड्या अन्यायाला नेसवलेली लक्तरं म्हणजे कायदा...कायदा म्हणजे न्यायाच्या डोळ्यांत केलेली धूळफेक...होम मिनिस्टर असताना, कैक विरोधकांना देशद्रोही म्हणून मी गजाआड बंद केलं, कायदेशीररीत्या...कायदेशीररीत्याच गोळ्या घालून अनेक चळवळी दडपल्या ... अरे, ज्यांनी कायदे केले त्यांनाच तू कायद्याच्या धमक्या देतोस ? आणि बाप्पा, तू कोणत्या तोंडानं मला न्यायाच्या तराजूत तोलणार आहेस ? प्रत्येक कायदेशीर गोष्ट ही न्याय्यच असते असं नाही.

बाप्पाजी : म्हणजे, माझ्या आरोपाला आत्ता तू प्रत्यारोपाने उत्तर देणार तर !

दाजीसाहेब : बिलकूल नाही...कारण तू विचारी आहेस आणि तुझ्याकडे बाप्पा, फाटक्या खिशाचा उसवलेला कोट नि एअर कंडिशन मर्सीडिज दोन्ही आहे. दोघांची किंमत तुला चांगली माहिती आहे. आणि बाप्पा, न सुटणारा प्रश्न मी नेहमी भिजत ठेवतो. म्हणजे तो आपोआप सुटतो. केस उभी राहायला खूप वेळ आहे. आपोआपच सुटेल...निघू मी ? पुन्हा येईन, जेव्हा तू भिक्याला निर्दोष सोडवशील. माझी खात्री आहे. तू त्याला सोडवशील. विश यू ऑल द बेस्ट !

[ दाजी निघून जातो. बाप्पाजी दिङ्मूढ होऊन उभा राहतो. सर्वत्र अंधार पसरतो. ]

अंक दुसरा प्रवेश दुसरा समाप्त

## अंक दुसरा : प्रवेश तिसरा

[ सर्वत्र अंधार पसरलेला असतो. अंधारातच कोर्टातील कलकल. 'ऑर्डर ऑर्डर' असा आवाज. केस सेशन कमिट केल्याचे इंग्रजी जजमेण्ट.

प्रकाश पसरतो. बाप्पाजींचे घर, बाबी पेपर वाचत बसली आहे. बाहेर हॉर्नचा नि गाडी थांबल्याचा आवाज. थोडा नर्व्हस बाप्पाजी प्रवेश करतो. ]

बाप्पाजी बाबे, आज अगदी मन लावून पेपर वाचते आहेस !
बाबी मन लावून नाही. कुठंतरी मन गुंतवायला...
बाप्पाजी : का ? काय झालं ?

[ बाबी पेपर खाली घेते. व्याकुळ कासावीस चेहरा. ]

बाबी : दाजीसाहेबांचा फोन आला होता...बाप्पाजींना म्हणावं भिकयाची केस सोडून द्या, नाही तर लग्न मोडलं म्हणून समजा.
बाप्पाजी : मी काय करू बाबे ?
बाबी : ( निग्रहाने ) लग्न मोडलं म्हणून समजा.
बाप्पाजी : साहेबरावला फोन केला होतास ?
बाबी : करायला नको होता, पण केला. क्लबमध्ये दारू पीत पत्ते खेळत बसला होता. म्हणाला, बाबे, मी मोठ्या बापाचा एक छोटा मुलगा आहे. मी वाया गेलेलं माझ्या बापाला परवडू शकतं. दारू-जुगारात फारसे पैसे

उडत नाहीत. पण मी विरुद्ध गेलेलं माझ्या बापाला खपणार नाही, चालणार नाही. माझ्यावर रागवू नकोस.

बाप्पाजी : इतक्या निर्लज्जपणे बोलला साहेबराव ?

बाबी : निर्लज्जपणे नाही, अपराधीपणे, कातरल्या आवाजात बोलला. मग मीच पुन्हा त्याला फोन केला. म्हटलं, सायबा, मी मोठ्या बापाची मोठी मुलगी आहे. तू नाही तरी मी नक्की तुझ्या बापाविरुद्ध जाऊ शकते. मी तुझ्यावर रागावणार नाही. तूही मला विसरू नकोस.

बाप्पाजी : बाबे !

बाबी : ( कासावीस होत उभी राहात ) बाप्पाजी...मला माहीत आहे....आज सायबा खूप पिणार. सारा राग खेळातल्या पार्टनरवर, क्लबातल्या नोकरांवर काढणार. खूप तमाशा, धिंगाणा करणार. लोक म्हणणार, बापाच्या जिवावर पोरगा माजला आहे...( बोलता बोलता खिशातून सिगारेट काढते. ) सॉरी. ( म्हणून पुटपुटत ती परत ठेवू लागते. इतक्यात— )

बाप्पाजी : ( झटन लायटर पेटवतो. ) ओढ बाबे, ओढ.

बाबी : मी विचारलं, सायबा पळून जायचं ? अंगावरच्या कपड्यानिशी येते. थोडा वेळ तो थांबला. हुंदका गिळायला वेळ लागतो ना...मग म्हणाला, बाबे, पळून कसा येऊ ? स्वतःची खुर्ची डगमगायला नको म्हणून माझ्या बापाने माझे दोन्हीही पाय कापून त्याच्या खुर्चीला चिकटवलेत . पळून जायला मला पाय नाहीत . बाबे, पण बेड्या पडायला हात आहेत.

बाप्पाजी : दाजी बेड्या ठोकेल ? सायबाला ?

बाबी : मोठ्या आनंदाने ! जर तो विरुद्ध गेला तर. वर पुन्हा न्यायी, निःस्पृह म्हणून दाजीसाहेबांचा केवढा मोठा लौकिक होईल. पोराच्या भ्रष्टाचारावर पांघरूण नाही घातलं. स्वतः त्याच्या हातात बेड्या ठोकल्या. ढोंग ..सारं ढोंग. स्वतः चरख्यावर सूत कातायचं, मुद्दाम ठिगळं लावलेला खादीचा कुर्ता घालायचा, पैसा मात्र पोराला पुढ्यात घालून कमवायचा. वाट्टेल त्या मार्गानं पैसा, खुर्ची टिकवायला...राजकारण खेळायला...सायबा इतका भाबडा आहे, आपल्या पोझिशनचा फायदा घेऊन आपले मित्र आपल्याला लुबाडतात, वापरतात हे देखील त्याला कळत नाही. तो काय लोकांना, सरकारला लुबाडणार !

[ बाप्पाजी फोन उचलतो डायल फिरवू लागतो. ]

बाबी : फोनचा काही उपयोग नाही बाप्पाजी ! सायबा खेळता खेळता डाव पॅक करून उठला आहे. बाथरूमला म्हणून गेला आहे. बाथरूमचा दरवाजा

बंद करून! भिंतीवर डोकं ठेवून रडतो आहे.

[ संतापून सिगारेट चिरडते ]

बाबी : एक बरं झालं बाप्पाजी, माझ्या डोक्यावरचं ओझं उतरलं. दाजीसाहेबांच्या दोन मिल्क डब्यांची किंमत मी अदा केली. त्यांच्या खुर्चीसाठी माझ्या सायबाचे दोन्ही पाय देऊन टाकले.

[ बोलता बोलता ती गहिवरते. बराच वेळ शांतता. मग बाप्पाजीच हसून काहीतरी बोलायचा प्रयत्न करतो ]

बाप्पाजी : बाबे, आयुष्यात तुझे सगळे हट्ट, सगळे लाड पुरवले मी. तुला कसली–कसली म्हणून कमी पडून दिली नाही. हीही कमी राहू द्यायचो नाही. उरल्या आयुष्याला स्मरून सांगतो, तुझ्या सायबाला त्याचे दोन्ही पाय मी परत मिळवून देईन.

बाबी : आलमगिराच्या डेऱ्याचे सोन्याचे कळस कापणार तुम्ही?

बाप्पाजी : हो बाबे! एक साधा मावळा जिवावर उदार झाला, तेव्हा आलमगिराचं तख्तही त्याच्या पायाशी येऊन धूळ खात पडलं. हा दाजी तर एक क्षुल्लक आमदार–नामदार आहे.

बाबी : आवेश चांगला आहे बाप्पाजी; पण तुम्हाला ते शक्य नाही.

बाप्पाजी : का?

बाबी : आय डोन्ट वॉन्ट टु इन्सल्ट यू...पण तुमची विद्वत्ता, संपत्ती, समाजात मानमरातब मिळवायला ..छोट्या छोट्या मित्रशत्रूंशी भांडायला पुरेशी आहे. पण जेव्हा सोनेरी मुगुट चढविलेल्या सत्तेशीच मुकाबला असतो, तेव्हा तो मुकाबला फक्त कोणी नंगा फकीरच करू शकतो, सुटाबुटातला बॅरिस्टर नाही.

बाप्पाजी : ( हसून ) बाबे, तो नंगा फकीरही बॅरिस्टरच होता. ॲण्ड फॉर युवर काईण्ड इन्फरमेशन ..वरच्या अलमारीत, माझा तो फाटक्या खिशाचा उसवलेला कोट अजून मी जपून ठेवलाय...

बाबी : ( भारावून ) बाप्पाजी!

बाप्पाजी : तो ज्या दिवशी मी माझ्या अंगावर चढवेन...दाजीचं नि माझं वैर सुरू होईल.

बाबी : लग्न मोडलं, तरी अजून त्यांनी वैर....

बाप्पाजी : ( अडवत ) बाबे, लग्न काय ..कोणीही मुलाचा बाप मोडू शकतो. लग्न

मोडून त्याने फक्त निषेध नोंदवला... वैर नाही... वैर तो धरेल...

बाबी : केव्हा ?

बाप्पाजी : जेव्हा त्याच्या लक्षात येईल. भिक्या सुटो नी सुटो, पण तो आता माझ्या तावडीतून सुटणार नाही. त्या दिवशी या केसचं स्वरूप बदलेल. भिक्याविरुद्ध सरकार अशी ही केस दाजीसाहेब विरुद्ध बाप्पाजी होईल.

बाबी : आणि त्याचीच मला भीती वाटतेय बाप्पाजी....

बाप्पा : का ?

बाबी : कारण...पापाच्या जंगलात पाय रोवून पापाशी लढता येत नाही.

बाप्पाजी : ( निक्षून ) मी काहीही पाप केलेलं नाही. काहीही बेकायदेशीर केलेलं नाहीय.

बाबी : बाप्पाजी, प्रत्येक कायदेशीर गोष्ट नीतीला धरून असेलच असं नाही. या दाजीच्या मैत्रीचा गैरफायदा घेऊन तुम्ही पंचवीस एकर बागाईत जमीन सरकारकडनं लाटलीत....

बाप्पाजी : स्वातंत्र्यसैनिक म्हणून सरकारनं मला दिली.

बाबी : ( चढ्या आवाजात ) बाप्पाजी...स्वर्गाकडे नजर ठेवून केलेल्या पुण्या-एवढं महापाप कोणतंही नाही. त्याग तुम्ही स्वातंत्र्यासाठी केला होता, की पंचवीस एकर बागाईत जमिनीसाठी ? बाप्पाजी, तुम्ही जमीन लाटलीत. काहीही काम न करता, घाम न गाळता. पाचपंचवीस बोर्डांवर, कमिट्यां-वर, कारखान्या-सोसायट्यांवर....डायरेक्टर नाही तर लीगल अॅडव्हायझर म्हणून जाऊन बसलात, प्रतिष्ठेच्या जोरावर. उद्या हेच जेव्हा दाजीसाहेब ओरडून लोकांना सांगेल तेव्हा तो दोषी असला तरी लोक म्हणतील... ( गप्प बसते. )

बाप्पाजी : काय ?

बाबी : सगळे पुढारी इथून तिथून सारखेच. बाप्पाजी, तेव्हा कशावरही कोणावरही त्यांची श्रद्धा, निष्ठा राहणार नाही. देशच रसातळाला पोचेल. आकाश कोसळेल.

बाप्पाजी : नाही बाबे, नाही. दगडाच्या देवावर जरी श्रद्धा बसली तरी शंभर दैत्यांशी माणसं लढतात. ही श्रद्धा मी भंगू देणार नाही. कोर्टात काहीही होवो. लोकांत या दाजीला मी उभा राहू देणार नाही...त्याच्यावर पहिला वार करण्याआधीच मी निःसंग झालोय. जमीन सरकारला परत केलीय सर्व बोर्ड, कमिट्या, कारखाने यांचा राजीनामा दिलाय. आता या बाप्पाजी-जवळ फक्त त्याच्या घामाचं तेवढंच शिल्लक आहे.

बाबी : बाप्पाजी, खरंच ?

बाप्पाजी : खरंच ग बाबे, खरंच. मी निःसंग झालोय बाबे ! जे प्रकरण दडपण्यासाठी हे खून झाले, ते प्रकरण मी चव्हाट्यावर आणणारच. या दाजीला येत्या

निवडणुकीत डिपॉझिटही वाचवू देणार नाहीय. परिणामाची क्षिती न बाळगता....हसत, गुणगुणत ?

बाबी : हसत ? गुणगुणत ?

बाप्पाजी : हां बाबे. सकाळपासनं लहानपणी पाठ केलेली एक कविता डोक्यात गुणगुणते आहे....

बाबी : काय ?

बाप्पाजी : आम्ही निःसंग झालो सुखे,
हे जळते क्षितीज तोलताना ।
आम्ही निःसंग झालो तसे
हे कोसळते आकाश पेलताना ।।

[ गाणे कोरसमध्ये वाढू लागते. हळूहळू अंधार होतो. ]

अंक दुसरा – प्रवेश तिसरा समाप्त

## अंक दुसरा : प्रवेश चौथा

[ रात्रीची वेळ. एका हातात ग्लास घेतलेला दाजीसाहेब पेपर चाळतो नि चिडून चुरगळतो, फेकतो. घाईघाईने, संतापलेला जाधवराव येतो. ]

जाधवराव : दाजीसाहेब, हा पेपर पाहिलात ?

दाजीसाहेब : ( शांतपणे ) शब्दन्शब्द वाचला.

जाधवराव : खाल्ल्या अन्नाशी हराम झालाय बाप्पाजी. असले आरोप ? जाहीरपणे ? आपल्यावर ? दिवसभर पोरांचा एकच गिल्ला...थर्ड क्लास जाधवराव ? थर्ड क्लास जाधवराव !

दाजीसाहेब : ( हसून ) वाईटातून चांगलं निघतं हे असं. जाधवराव, तुम्ही थर्ड क्लास का होईना, पण एम. ए. आहात एवढं तर कळलं पोरांना ?

जाधवराव : दाजीसाहेब, तुम्ही हसण्यावारी न्या, पण मी नाही. हा पाहा...हा पाहा... ( खिशातून लेख काढून दाजीच्या समोर धरतो. ) आताच छापायला पाठवतो आहे. बाप्पाजींच्या डोक्यावर एक केस बाकी नाही ठेवणार. गरिबांचा कनवाळू स्कॉच व्हिस्की कसा पितो ? स्वातंत्र्य सैनिक जमीन कशी लाटतो...

[ दाजीसाहेब एकवार नजर टाकून शांतपणे लेख फाडतो. ]

जाधवराव : ( पुढे होत ) हे काय...हे काय दाजीसाहेब ?

दाजीसाहेब : जाधवराव, सत्तेच्या खुर्चीला एकच पाय असतो. ज्याला सत्ता भोगायची आहे, त्याला स्वतःचा तोल सांभाळता आला पाहिजे. जो बेताल झाला,

तो नेस्तनाबूत झाला.

जाधवराव : म्हणजे, बाप्पाजींच्या आरोपाला काहीच उत्तर नाही द्यायचं ?

दाजीसाहेब : द्यायचं ना ! लिहून घ्या ..

[ जाधवराव पॅड हाती घेऊन लिहू लागतो. ]

दाजीसाहेब : " आमचे गेल्या दोन तपाचे गुरुतुल्य स्नेही बॅरिस्टर बाप्पाजी यांची आजची शारीरिक आणि मानसिक—मानसिकला इनव्हर्टेड कॉमा—मानसिक अवस्था पाहता, त्यांनी आमच्यावर केलेले, जाहीरपणे केलेले बेजबाबदार आरोप...खेदजनक असले तरी धक्कादायक खचितच नव्हेत ...बचाव हा गुन्हेगाराने करायचा असतो, निर्दोष माणसाने नाही. तेव्हा, सदर आरोपांबाबत आम्ही काहीही स्पष्टीकरण करू इच्छित नाही .. परंतु, जनता जनार्दनाच्या मनात काहीही किंतू निर्माण होऊ नये म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांना आम्ही जाहीर विनंती करतो की, सदर आरोपांची त्यांनी जातीने चौकशी करून अपराध्यांना कठोरात कठोर शिक्षा द्यावी. "

जाधवराव : ( दचकून ) दाजीसाहेब, सी. एम. च्या हातात तुम्ही कोलीत देताय ?

दाजीसाहेब : हो. त्याची शेंडी हातात पकडल्यानंतर.

जाधवराव : ( विस्मयाने ) कालपर्यंत ज्याला डावा अतिरेकी, पंचमस्तंभीय म्हणून शिव्या दिल्या...

दाजीसाहेब : जाधवराव, राजकारणात आयाबहिणीवरनं शिव्या देता येत नाहीत म्हणून उजवा प्रतिगामी, डावा साहसवादी, अशा राजकीय शिव्या द्याव्या लागतात. त्यातल्या अर्ध्या शिव्यांचा तर अर्थसुद्धा मला माहीत नाही.

जाधवराव : ( खेदाने ) काही का असेना, तुम्ही पुन्हा सी. एम.शी दोस्ती केलीत, स्वतःचा मार्ग बदललात.

दाजीसाहेब : जाधवराव, मार्ग नाही. शीड बदललं...वारा येईल त्याप्रमाणे आम्ही शीड बदलत असलो तरी आमचं जहाज आमच्याच मार्गानं चाललेलं असतं. पुढचं लिहा...

[ जाधवराव पुन्हा खालच्या मानेने लिहू लागतो. ]

" बॅरिस्टर बाप्पाजींना आमची नम्र विनंती आहे की, राजकीय मतभेदांसाठी त्यांनी आमचा राजकीय पराभव करावा...चारित्र्य-हननाचा हीन मार्ग लोकशाहीत बसत नाही. "

जाधवराव : ( हसत ) हं. मूर्ख लोकांची लोकशाही...

दाजीसाहेब : जाधवराव, लोक मूर्ख आहेत म्हणूनच लोकशाहीचा हा खेळ आपल्याला परवडतो आहे. लोकं शहाणी झाली तर....

जाधवराव : ( मूर्ख उत्साहाने ) पार्लमेन्टात सोडा...म्युनसिपालटीत मेंबर म्हणून पाठवायचे नाहीत तुम्हाला... ( बोलून जातो नि एकदम ओशाळतो. )

दाजीसाहेब : आणि आमचा मंत्री म्हणून शपथविधी झाला नाही, तर, जाधवराव, थर्ड क्लास एम. ए.ची नेमणूक प्रिंसिपॉलपदी होणार नाही.

जाधवराव : ( लाचारीने ) ते खरंच, ते खरंच. पण दाजीसाहेब, बाप्पाजींपुढं इतकं लीन होऊन वाकताय तुम्ही.

दाजीसाहेब : जाधवराव, कोणाच्या कमरेखाली वार करायचा म्हटलं की, आधी स्वतःलाच थोडं वाकावं लागतं.

जाधवराव : ( कागद फडकावत ) यात....यात काय केला आपण कमरेखाली वार ?

दाजीसाहेब : जाधवराव, मोठ्याने ओरडण्यापेक्षा...कानात कुजबुजण्याने विष लवकर पसरतं.

जाधवराव : ( न समजून ) म्हणजे ?

दाजीसाहेब : बस्स ! तुम्ही एक-दोघांच्या कानात नुसतं कुजबुजा ! बाप्पाजी दाजीसाहेबांवर दात ठेवून आहेत. कारण बाबीचं वागणं पसंत न पडल्याने दाजीसाहेबांनी लग्न मोडलं.

जाधवराव : बाबीचं वागणं म्हणजे ?

दाजीसाहेब : प्रश्न नको. तुम्ही एवढंच कुजबुजा. मग एकाचं दोन करून लोक काय बडबडतील ते ऐकूही नका, बोलूही नका. कशाला आपली कान–जीभ विटाळायची ?

जाधवराव : ( कळवळत ) नाही, नाही दाजीसाहेब. लग्नाची मुलगी, तिला नका आयुष्यातून उठवू.

दाजीसाहेब : तिला नाही. या बाप्पाला आयुष्यातून उठवणार आहे मी. पुन्हा एकदा गुडघे टेकत शरण आला पाहिजे हा मला.

जाधवराव : सर, सर म्हणत सारखी पिंगा घालायची हो भोवती, फार लाघवी मुलगी आहे ती दाजीसाहेब.

दाजीसाहेब : मलाही वाईट वाटतं. पण नाइलाज आहे. जाधवराव, आता ती मुलगी नाही...शत्रूचं गंडस्थळ आहे.

जाधवराव : शत्रूचं गंडस्थळ ?

दाजीसाहेब : कितीही पिसाळलेला हत्ती असो जाधवराव...साधा अंकुश गंडस्थळाला टोचला की, जागीच उभा राहतो. प्रत्येकाचं एकेक गंडस्थळ असतं जाधवराव...तुमचं कसं, एम. ए.चं सर्टिफिकेट, तसं बाप्पाजीचं फाटक्या

खिशाचा उसवलेला कोट, नि दुःखाचा एक डबा... (बोलता बोलता दाजीसाहेब उठतो. पेग घेता घेता...) जाधवराव, काही माणसं पैशाला, खुर्चीला, शरण जातात. काही माणसं भाकरीला, ताठ मानेला शरण जातात. बाप्पाजी दुसऱ्या जातीचा माणूस आहे. तो गर्दन काढून देईल, पण गर्दन झुकवायची वेळ आली तर ? लाचार होऊन पायाशी (एकदम त्वेषाने ग्लास फोडतो...उठतो नि चिडून) जाधवराव, मास्तरणीवर बलात्कार करणारा तुमचा तो हलकट पाजी मेव्हणा...

जाधवराव : (थरथरत) बस्स, तुमच्याच कृपेनं इन्कमटॅक्स कमिशनर आहे...

दाजीसाहेब : त्याला म्हणावं खाल्ल्या पैशाला जाग. बाप्पाजीच्या घरावर धाड टाक. पै-पैशाच्या हिशोबासाठी त्याची लांडगेतोड कर.

जाधवराव : हां, आत्ता फोन करतो.

दाजीसाहेब : आणि ज्या ज्या सोसायट्या, बँका, फॅक्टऱ्यांमध्ये बाप्पाजी डायरेक्टर, लीगल ॲडव्हायझर आहे तिथनं त्याला ठराव करून उडवून लावा.

जाधवराव : बस्स, चार दिवसांचंच काम...

दाजीसाहेब : आणि जाधवराव, त्या पोलिस प्रॉसिक्युटरला जाऊन भेटा. एखादा टी. व्ही. नाहीतर फ्रीज नेऊन द्या त्याला. काय वाट्टेल ते माग म्हणावं. आणि सांगा...

जाधवराव : काय सांगू ?

दाजीसाहेब : त्याला म्हणावं. हा खून खटला—सरकार विरुद्ध भिक्या असा नाही...हा खटला आहे 'दाजीसाहेब विरुद्ध बाप्पाजी'! बड्या बड्या कायदेबाजांची मदत घे म्हणावं. प्रत्येक मुद्द्यावर खरा असो वा खोटा असो, चूक असो वा बरोबर...हायकोर्टात जा. वर पुन्हा सुप्रीम कोर्टात जा. पण हा न्याय, न्याय एवढा महागडा कर की कोर्टाच्या पायऱ्या चढता चढता बाप्पाजी जीव टाकेल.

जाधवराव : हो हो, सांगतो !

[दाजीसाहेबांच्या जमदग्नी अवताराकडे पाहून घाबरलेला जाधवराव डायल फिरवू लागतो.]

दाजीसाहेब : (स्वतःशीच बडबडतो) बाप्पा, अरे माझ्या शेपटीवर पाय देण्याआधी माझ्या विषाचा हिशोब करायला पाहिजे होतास ! असं विष पसरवीन गावात; तुला तोंड दाखवायला जागा राहणार नाही. गाडीची मिजास सोड, अन्नाच्या घासाला महाग होशील तू ! पुन्हा एकदा उसवलेल्या कोटाचा, फाटक्या खिशाचा ब्रिफलेस बॅरिस्टर होशील तू. आकाश पेलायला

निघाला आहेस. धुळीला मिळून माझ्या पायाशी लोळशील तू !
[ हाताने ताडकन् बाप्पाजीचा फोटो टेबलावरून उचलून दूर फेकतो...
फोटो खाली पडून फुटतो. ]

जाधवराव : दाजीसाहेब, तुमचा तोल जातोय ! दाजीसाहेब, तुमचा तोल जातोय !

[ पडदा पडतो. ]

अंक दुसरा समाप्त

२०५६२
१८/१०/८४
नाटक

# अंक तिसरा : प्रवेश पहिला

[ पडदा उघडतो. सकाळची वेळ. बाप्पाजींचे घर. घरावर दारिद्र्याची अवकळा पसरू लागली आहे. फटाके व ढोल-लेजीमचे आवाज येत आहेत. दाजीसाहेबांच्या जयजयकाराच्या घोषणा. बाप्पाजी उदासपणे बसले आहेत. पोर्चमध्ये गाडी थांबल्याचा आवाज...बाबी येते. घामाने थबथबलेली. हातात पेपर. ]

बाप्पाजी : गाडी ? गाडी कुणाची घेऊन आलीस ?

बाबी : [illegible] भेटला होता, त्यानं दिली. सांगितलं...

बाप्पाजी : काय सांगितलं ?

बाबी : बाप्पाजींना घेऊन दोन-चार महिन्यांसाठी ताबडतोब बाहेरगावी कुठंतरी निघून जा...

बाप्पाजी : म्हणजेच पळून जा.

बाबी : हो ! वातावरण थोडं शांत झालं की आपण परत येऊ.

बाप्पाजी : नाही बाबे ! आता पाठ दाखवायची नाही. दाजी जर मारेकरी घालणारच असेल...

बाबी : दाजीसाहेबांचं राहू देत. जमावानेच हल्ला केला तर ? शहरात जिकडेतिकडे विजयाचा जल्लोष चालला आहे. दाजीसाहेब जिंकले. प्रचंड बहुमताने जिंकले. जिंकल्याक्षणीच बावीस आमदारांना घेऊन टोपी फिरवली, मुख्यमंत्री होण्यासाठी.

बाप्पाजी : ( हताशपणे ) दाजी जिंकला...मुख्यमंत्री झाला ! एवढं जंग जंग पछाडलं...अहोरात्र प्रचार केला...सारे बुद्धिवादी, साहित्यिक, कलावंत, घराबाहेर काढून त्यांना दाजीविरुद्ध उभं केलं. तरी दाजी जिंकला !

हरकत नाही. लोकांनी नाही केली तरी, कोर्टात तरी त्याला शिक्षा होईल. सगळी सगळी प्रकरणं कोर्टात पुराव्यानिशी नेणार आहे मी.

[ पोर्चमध्ये गाडी उभी राहिल्याचा आवाज. गुलालाने माखलेला दाजी येतो. जिंकल्याचा आनंद दिसत नाही. अतिशय थकलेला, हताश झालेला दाजी येतो गेन्या व मारत्या उद्दामपणे तोऱ्यात दारातच उभे. ]

दाजीसाहेब : बाप्पा, कसा काय आहेस ?
बाप्पाजी : ठणठणीत...तू कसा आहेस ?

[ दाजी बसतो. कपाळावर हात. थकलेल्या आवाजात. ]

दाजीसाहेब : उगाच...उगाच मारलं त्या संपादकाला. निष्कारण ! काही जरुरी नव्हती, तरी भीतीपायी मारलं. जे छापलं जाऊ नये, म्हणून मारलं, ते तू सर्व छापलंसच...जाहीर सभेतही सांगितलंस. तरी मी निवडून आलो...

बाप्पाजी : म्हणून खिजवायला आला आहेस ?

दाजीसाहेब : नाही. तुला वाचवायला...

बाप्पाजी : ( उपहासाने ) मला वाचवायला ?

दाजी : हो ! निवडणूक जिंकली. घरासमोर हजारो लोकांचा जल्लोष व्हायला लागला. भीती वाटली, ज्या लोकांवर राज्य करायचं, त्यांची भीती वाटू लागली.

बाप्पाजी : भीती ? कशासाठी ?

दाजीसाहेब : अरे, निवडणूक लढतो कोण ? जिंकतो कोण ? आणि उन्माद कोणाला ? निवडणुकीनं ज्यांचा काडीचा फायदा नाही, त्या लोकांना ? वाटलं, आधीच विषारी प्रचार खूप केला आहे...आता या उन्मादाच्या भरात तुझ्या घरावर जमाव चालून आला...हजार गुंड खडी फोडायला पाठविलेस तू आजवर. त्यातलाच कोणी घात करायचा.

बाप्पाजी : बरं होईल. सुंठीवाचून खोकला जाईल तुझा...

दाजीसाहेब : नाही बाप्पा, नाही. अरे माझा पापाचा घडा इतका भरत आला आहे... पडणाऱ्या एकेक खड्याचीसुद्धा भीती वाटते. म्हणून तुझ्या प्रकृतीची चौकशी करायच्या निमित्ताने आलो. जरा टेन्शन कमी होईल...नव्या मुख्यमंत्र्यांच्या इमेज-बिल्डिंगलाही सुरुवात होईल.

जाधवराव : ( प्रवेश करून ) दाजीसाहेब, तुमचा आणि बाप्पाजींचा बाबीच्या साखरपुड्याच्या वेळचा फोटो आहे ना, बाप्पाजी तुमच्या तोंडात पेढा

घालताहेत. तोच पाठवून दिला पेपरला, आता आयत्यावेळी कोठनं फोटो....

दाजीसाहेब : बरं झालं. तेवढेच पैसे वाचले. घाम फुटला या वेळी. दोन लाख मतदार आणि वीस लाख रुपयांचा चुरा!

बाप्पाजी : एवढं बरंय दाजी, निवडणुकीच्या निमित्ताने का होईना, महागाई वाढते आहे याचा पत्ता तुम्हाला लागतो तर.

दाजीसाहेब : हो, महागाई वाढतीय. दिवसेंदिवस माणसं स्वस्त होतायेत...वस्तू महाग होताहेत...

बाप्पाजी : आणि म्हणून तू दरवेळी जिंकतो आहेस!

दाजीसाहेब : नाही, मी जिंकत नाही. मी फक्त वाचतो....निसटतो...सुटतो जिंकलो फक्त एकदाच. पहिल्या निवडणुकीत. तेव्हा धड पैसा नव्हता की गाडया. तरी मी जिंकलो? पूर्वपुण्याईनं. एकाच निवडणुकीत ती पुण्याई संपली. नंतर उरली फक्त सत्ता, राजकारण, पैसा, अस्तित्व...येणारी प्रत्येक निवडणूक म्हणजे आत्ता मला जीवन-मरणाची लढाई वाटते, लढाई. निकाल लागेपर्यंत टेन्शन वाटतं, हरलो की संपलो. विरोधक या दाजीचे धिंडवडे काढतील. आणि जिच्यासाठी ही सारी पापं केली तीच जनता नामानिराळी राहून तमाशा पाहील, तमाशा.

बाप्पाजी : पापाचा घडा भरलास तू आणि त्यात लोकांना आता वाटेकरी करतो आहेस?

दाजीसाहेब : का नको करू? अरे, वाल्या कोळ्याने काय फक्त स्वतःसाठीच वाटमारी केली? पण ज्यांच्यासाठी केली ना, तीच बायकापोरं नंतर नामानिराळी झाली.

दाजीसाहेब : बाप्पा, त्या वाल्याचा नंतर वाल्मिकी झाला. पण या दाजीचा कधी महात्मा होऊ शकणार नाही. बाप्पा, स्वातंत्र्यानंतरची ही तरुण पिढी जशी दुर्दैवी, तसेच आम्ही पुढारीसुद्धा! महात्मा गांधी केवढा मोठा नेता, पण किती सुखी! जनता त्याच्याकडे फक्त एकच मागत होती. स्वातंत्र्य. फक्त स्वातंत्र्य. सर्वांसाठी स्वातंत्र्य. आता? प्रत्येकजण स्वतःसाठी काहीतरी मागतो. कोणाला लायसन्स, कंत्राट, बढती, नोकरी, वशिला—प्रत्येकाला काही ना काही तरी हवंय. कसं देता येणार ते? मग? नाही देणारा पुढारी काय कामाचा? नवसाला न पावणारा देव देखील चालत नाही लोकांना. पुढारी कसा चालेल? अरे, त्या महात्म्याकडे अख्ख्या आयुष्यात जेवढे लोक खाजगी कामासाठी गेले नसतील ना, तेवढे तर आता एका गल्लीतल्या कॉर्पोरेटरकडे येतात. बाबीताई, जरा थंड पाणी देणार?

बाबी : (तिरस्काराने) माझ्यासारख्या उनाड मैनेच्या हातचं पाणी....

बाप्पाजी : ( दटावत ) बाबे ! पाणी आण.

दाजीसाहेब : बाबीताई रागावलीय. बरोबर आहे तिचंही. पण, मी तरी काय करणार ? ( बाबी पाणी आणून देते. दाजीसाहेब पितात. ) फार दमवलंस बाप्पा. जिंकून येण्यासाठी काय काय करावं लागलं मला. कशाला माझ्याविरुद्ध एवढे रानभर हाकारे घातलेस ?

बाप्पाजी : तुझ्याविरुद्ध नाही, तुझ्या जुलमाविरुद्ध, भ्रष्टाचाराविरुद्ध.

दाजीसाहेब : मग कुलटेला मारायचं होतंस, तर दगड तरी सती साध्वीच्या हाती द्यायचा. तू कोणाच्या हाती दिलास ? ( आवाज चढवत ) माझ्यावर ' किमया खुर्चीची ' काढणारा तो नाच्या फिल्मवाला ! विचार त्याला, त्याची तिजोरी काळ्या पैशाने भरली असताना, माझ्याकडे कोणत्या तोंडाने हिशोब मागत होता ? पोरापोरींच्या चावट प्रेमकथा लिहिणारा तो थेरडा कादंबरीकार, साहित्य संमेलनाचा अध्यक्ष झाला. म्हणजे काय, किंगमेकर झाला ? विचार त्याला, साधं संमेलनाचं अध्यक्षपद मिळविण्यासाठी गटबाजी, चमचेगिरी करणारे तुम्ही....भेळवाले, सायकलवाले, सभासद करणारे तुम्ही मी मंत्रिपदासाठी दहा आमदार विकत घेतले म्हणून का बोंबलत होता ? सवंग लोकप्रियतेसाठी, पैशासाठी अश्लील आणि बीभत्स नाटकं लिहिणारा तो नाटककार ? मी सत्तेवर असताना माझ्याविरुद्ध लिहायची का नाही हिंम्मत झाली त्याची ? सांग त्याला, लोकांनी तिकिटं तुझी घेतली; पण मतं मात्र मला दिली. तो बोकडदाढीचा ढापण्या विचारवंत. अमेरिकेला जायला मिळावं म्हणून कोण्या मंत्र्याकडे किती दिवस खेट्या घालत होता ? विचार...विचार त्याला. या सगळ्यांची लायकी लोकांना माहिती आहे ! बाप्पा, म्हणून तर त्यांच्या प्रचाराला काडीची किंमत नाही दिली मतदारांनी. अरे, तुझे हे विचारवंत, बुद्धिवादी साहित्यिक ' साहित्यनगरी ' बांधण्यासाठी कवडी किंमतीत सरकारी जागा उपटायला माझ्याकडे आले होते. का ? त्यांना घरं पाहिजेत. रस्त्यावरच्या हमालाला नको ! बेघरांसाठी घरं नाही मागितली त्यांनी. स्वतःसाठी फ्लॅट मागितले. मीही फेकले दोन तुकडे. म्हटलं, कुत्री चूप बसतील. चूप होती....जोपर्यंत मी सत्तेवर होतो. माझी सत्ता गेली नि लगेच हे लोकशाहीचे, स्वातंत्र्याचे कैवारी झाले ! चोहोबाजूंनी माझ्यावर भुंकू लागले काय ?

जाधवराव : ( अजिजीने ) दाजीसाहेब, निघायचं ना ? संध्याकाळी शपथविधी आहे. रात्री रेडियोवर, टी. व्ही.वर भाषण आहे.

दाजीसाहेब : हो. भाषण करायचं आहे....देशाच्या उज्ज्वल भविष्याची निरर्थक चर्चा करायची आहे. भाषण लिहून झालं का ?

जाधवराव : लिहितोय. संध्याकाळपर्यंत होईल.

दाजीसाहेब : चांगलं अभ्यासपूर्ण लिहा. मुख्यमंत्र्यांनी करायचं भाषण आहे. कोठल्याही वर्गाचा, जातीचा स्वार्थ दुखावणारं काही लिहू नका. आणि अक्षर मोठं नि सुवाच्य काढा. गेल्यावेळी किरट्या अक्षरात काहीतरी लिहिलंत, धड वाचता आलं नाही आम्हाला. मग या कोत्या विचारवंतांनी कुचेष्टा केली आमची, धड भाषण वाचता न येणारा शिक्षणमंत्री.

जाधवराव : या वेळी व्यवस्थित लिहितो. चला, आपल्याला शोभायात्रेला जायचं आहे.

दाजीसाहेब : शोभायात्रा ! ( हसतो ) वा...दाजी, दांडीयात्रेतून तू शोभायात्रेत केव्हा आलास ? तुझं तुला तरी कळलं का ? चला, दहा पुतळ्यांना हार घालायचे आहेत.

जाधवराव : ( हसत ) दहा नाही सतरा. आता सतरा पुतळे झालेत गावात.

दाजीसाहेब : हसता काय जाधवराव ? पापं वाढली, की देवळं वाढवावीच लागतात. चला, संध्याकाळी शपथविधी होणार. आम्ही या राज्याचे राजे होणार. बाप्पा, लहानपणी धडा वाचायचो, ऊर दाटून यायचा. शेतकऱ्याचा मुलगा राजा होणार...आणि मी राजा झालो बाप्पा. राजा झालो नि लक्षात आलं, शेतकऱ्याचा मुलग राजा होऊ शकतो. पण राजा कधीच शेतकऱ्याचा मुलगा राहात नाही. म्हणून तर, श्रीमंतांना या गरीब देशातही लोकशाहीचा खेळ परवडतोय.

बाप्पाजी : मग लाथ मार अशा सत्तेला !

दाजीसाहेब : माझा पाय मोडेल, आणखी काही होणार नाही. सत्ता म्हणजे बाहेर न पडता येणारा चक्रव्यूह. अरे, एक खोटं लपविण्यासाठी दहा वेळा खोटं बोलावं लागतं. तरी एकदा मिळवलेली सत्ता पचविण्यासाठी जन्मभर सत्ताच मिळवावी लागते. यातनं निवृत्ती नाही.

बाप्पाजी : मग, हातात सत्ता आहे तर, तिचं रूप तरी बदल....

दाजीसाहेब : म्हणजे काय होईल, बाप्पा ? साप जरी कात टाकतो तशी सत्ता रूप बदलते. कधी राजा, जमीनदार, कधी एकाधिकारशहा, हुकूमशाही, कधी तिरंगी लोकशाही, कधी लालरंगी कष्टकऱ्याची हुकूमशाही. पण, प्रत्येक रूपाआड तीच सत्ता दडलेली असते. कधीकधी ती माणसाला हालहाल करून मारते, कधी अस्वलासारख्या गुदगुल्या करून.

बाप्पाजी : म्हणजे आज जी शपथ घेणार ती खोटी ? भाषण करणार ते खोटं ?

दाजीसाहेब : खोटं नाही, निरर्थक. खूप काही करायचं होतं, न्याय द्यायचा होता लोकांना, पण तो मला कधीच देता येणार नाही. बाप्पा, दोन दुधाच्या पावडरचे डबे जर तुला एवढे महाग पडले तर निवडणूक फंडासाठी श्रीमंतांकडून घेतलेले हे वीस लाख रुपये मला किती महाग पडतील ? सत्ता आणि संपत्ती एकाच शक्तीची दोन रूपं आहेत. ज्याच्या हातात संपत्ती

आहे, त्याच्याच हातात सत्ता राहील. (बाकी तत्त्वज्ञान झूट. तत्त्वज्ञान सांगून सत्ता मिळवता येते. पण सत्ता मिळवून तत्त्वज्ञान आचरणात आणता येत नाही.) राजकारण्याचा ड्रेस एवढाच निरनिराळ्या रंगाच्या टोप्यांचा अर्थ.

जाधवराव : उशीर होतोय दाजीसाहेब. निघायचं ना ? शपथविधी...

दाजीसाहेब : हो, शपथविधी. मी मुख्यमंत्री होणार. फार अटीतटीची निवडणूक जिंकलो मी. राज्यात दोनशे आठ खून झाले. एकशे ब्याण्णव दंगली झाल्या. अठ्ठ्याण्णव वेळा गोळीबार झाला. करोडो रुपयांची माती झाली. प्रचाराच्या नावाखाली सगळ्यांनी सगळ्यांना शिवीगाळ केली. निवडणुकीची धुळवड संपली नि मी जिंकलो.

[ एकाएकी दगडासारखा उभा राहतो ... निश्चल, निर्विकार, स्वतःला हरवून निर्जीवपणे बोलू लागतो. ]

दाजीसाहेब : भारतीय युद्ध संपलं. अठरा अक्षौहिणी सैनिक मारले गेले. लाखो स्त्रिया विधवा आणि मुले अनाथ झाली. जिंकूनही युधिष्ठिर हरला. हे सर्व कशासाठी ? राजा व्हावं म्हणून, लाखो माणसं मारली आपण ? हताश आणि अगतिक धर्मराज शरपंजरी पडलेल्या भीष्माजवळ गेला. विचारता झाला...तात, राजा कोण असतो ? कशासाठी असतो ? तो कसा जन्माला आला ? पितामह म्हणाले, धर्मा, आधी राजा नव्हता की प्रजा नव्हती... लोक गुण्यागोविंदाने प्रेमाने राहात होते. पण, एके दिवशी संपत्तीचा जन्म झाला आणि कली उदयाला आला. स्वार्थासाठी, पैशासाठी, माणसं भांडू लागली. खून, दरोडे घालू लागली. सर्वत्र एकच अराजक माजलं...यज्ञयाग बंद पडले. ज्ञानार्जन थांबलं. स्वतःच निर्माण केलेल्या अराजकाला लोक भ्यायले, घाबरले ! ब्रह्मदेवाकडे गेले. त्याची त्यांनी करुणा भाकली। हे सृष्टिकर्त्या, आम्हाला कोणी शास्ता दे, राजा दे. ब्रह्मदेवाने मनूला सांगितलं, ‘ मनू, तू यांचा राजा हो. ’ मनू म्हणाला, ‘ कसा होऊ ? राजा झालो तर त्यांची पापं माझ्या माथी मला घ्यावी लागतील. ’ लोक म्हणाले, ‘ घे...बदल्यात तुला आम्ही आमच्या उत्पन्नाचा दहावा भाग करभार म्हणून देऊ. आमच्या उपवर कन्या आधी तुला अर्पू. ’ आणि मनू राजा झाला. अशा रीतीने भ्रष्ट समाजानं, वर्गजातीनं पीडलेल्या समाजानं पहिला राजा जन्माला घातला. जो जन्माआधीच विकला गेला होता. तीच परंपरा मी चालवतो आहे. पीपल्स गेट द गव्हर्नमेन्ट दे डिजर्व्ह. लोकांना लोकांच्या लायकीप्रमाणेच सरकार मिळतं.

जाधवराव : ( हलवत ) दाजीसाहेब, तुम्ही भान हरपताय...तुम्ही भान हरपताय....

दाजीसाहेब : ( भानावर येत ) भान हरपलो नव्हतो जाधवराव...थोडा वेळ भानावर आलो होतो. घाबरू नका असे जाधवराव. एकदा शपथविधी होऊ दे, मी पूर्ववत बेभान होईन. निघायचं ?

जाधवराव : हो. उशीर नको व्हायला. उगाच उद्या पेपरमध्ये टीका व्हायची.

[ निघतात. ]

दाजीसाहेब : ( थबकून ) बाप्पा...केव्हाच चेंदामेंदा केला असता तुझा, पण त्या आधीच तू निस्संग झाला आहेस...तरी पण बाप्पा, या लढतीत तुला चितपट मारीन मी. काही झालं तरी भारी वजनाचा पैलवान आहे मी. जमलं तर मला क्षमा कर. निदान रागावू तरी नकोस. मी तरी काय करू ? एका भ्रष्ट समाजाचा, भ्रष्ट पुढारी आहे मी. पापी लोकांचा पापी राजा आहे मी. बुडत्या राज्याचा धनी आहे मी....बुडत्या राज्याचा धनी !

♠ ♠

## अंक तिसरा : प्रवेश दुसरा

[ संध्याकाळची वेळ. बेल वाजते. खिन्न चेहऱ्याने बाबी येऊन दरवाज उघडते. बाहेर पुस्तकांचे ओझे घेतलेला, घामाने थबथबलेला, दमलेला बाप्पाजी उभा आहे. ]

बाबी : ( पुस्तके घेत ) बाप्पाजी, चालत आलात कोर्टापासून ?

बाप्पाजी : ( बसत ) हो...

बाबी : कशाला ? टांग्यापुरते पैसे ठेवले होते कोटाच्या खिशात. उगाच चालत आलात.

बाप्पाजी : उगाच नाही, मुद्दाम चालत आलो. म्हटलं, पाहावं, माणसांपासून न्याय किती दूर आहे. वाटलं होतं, आजही सरकारी वकील पुन्हा खुसपट काढणार. पार दिल्लीपर्यंत वाऱ्या करायला लावणार. खालचं कोर्ट, वरचं कोर्ट, हायकोर्ट, सुप्रीम कोर्ट. एकही निर्दोष माणूस फासावर जाऊ नये म्हणून आम्हीच रचलेल्या या न्यायाच्या पायऱ्या....त्या पायऱ्यांखाली फक्त निर्दोष माणसंच चिरडली जातायत.

बाबी : ( खिन्नपणे ) खरंय. निर्दोष असून भिव्या गेली दीड वर्षे तुरुंगात खितपत पडलाय. आणि सायबा निर्दोष असून कायदेशीररीत्या कसं सिद्ध करावं या विवंचनेत. बाप्पाजी, कॉलेज बिल्डिंगची केस दाखल झाली ?

बाप्पाजी : हो...सज्जड पुराव्यानिशी दाखल केली. परवा सुनावणीस निघेल. उद्या माझ्यासमोर गर्जना करून खटल्यात दाजीसाहेब साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभा असेल. नि परवा कॉलेज बिल्डिंग खटल्यात सायबा आरोपीच्या पिंजऱ्यात उभा असेल.

बाबी : ( उदास होत ) परवा कॉलेज बिल्डिंग खटला... थोड्याच दिवसांनी शुगर फॅक्टरीच्या ऑनमनीचा खटला....मग जसजसे पुरावे उपलब्ध होतील, तसतसे नवे खटले. बहुतेक खटल्यात सायबा, आरोपी नंबर एक म्हणून नाही तर, आरोपी नंबर दोन म्हणून. निरपराध, निर्दोष असताना...

बाप्पाजी : निर्दोष कसा म्हणतेस बाबे ? बापाच्या कारस्थानात सहभागी होता ना तो ? सज्ञान होता...

बाबी : बरोबर आहे ! एकवीस वर्षाच्यावर होता. म्हणजे सज्ञान होता. कायद्याने तो सज्ञान होता हे ठरू शकतं. पण तो असाहाय्य आणि अगतिक होता, हे नाही ठरू शकत. पेपरांमधून सुरू झालेली बदनामी नि खटले त्यांना कसं तोंड द्यायचं, या विचारानेच सायबा वेडापिसा व्हायला लागलाय.

बाप्पाजी : ( थबकून ) सायबा तुला भेटला होता ?

बाबी : भेटला नव्हता, भेटत असतो.

बाप्पाजी : दाजीच्या मनाविरुद्ध ? इच्छेविरुद्ध ?

बाबी : दाजीसाहेबांनी त्याला लग्न मोडलं म्हणून सांगितलंय, प्रेम तोडलं म्हणून नाही सांगितलं.

बाप्पाजी : आणखी काय म्हणत होता सायबा ?

बाबी : काय म्हणणार ? म्हणाला मोठ्यांच्या साठमारीत आपले छोट्यांचे जीव चाललेत. बदनाम होऊन खडी फोडायला लागेल या कल्पनेनंच घाबरून गेलाय तो.

बाप्पाजी : त्याला म्हणावं घाबरू नकोस. दाजीचा एकुलता एक लाडका मुलगा आहेस तू. तुला वाचवायला दाजी जंग जंग पछाडेल. वेळ प्रसंगी दुसऱ्या कोणाला सुळावर चढवेल. तुझी काळजी घ्यायला तुझा बाप समर्थ आहे.

बाबी : कसले आले आहेत समर्थ ? सायबा सांगत होता; दाजीसाहेबांचा थोडासा वेळ मंत्रालयात, बाकी सगळा खलबतांमध्येच जातो.

बाप्पाजी : का ?

बाबी : निवडणुकीत हरवता आलं नाही, म्हणून तुम्ही त्यांना कोर्टात तरी खेचलाय. पण बाकीच्या विरोधकांना तेवढीही सवड नाही. पुन्हा पाच वर्षे थांबायला वेळ नाही. ते माणसं फोडून दाजीसाहेबांना खाली खेचायच्या मागे आहेत. आणि माणसं फुटू नयेत म्हणून दाजीसाहेब गर्क आहेत.

बाबी : दोन आघाडया दाजीसाहेब लढवू शकत नाहीत ! आणि त्यांच्याशिवाय एकटा सायबा तुमच्यापुढे टिकू शकणार नाही. दाजीसाहेबांना मुलगा असला तरी तो त्यांच्यासारखा बेडर, धूर्त, हुशार नाहीय.

बाप्पाजी : माहितीय मला. सायबा हा दाजीचा वीक पॉइंट आहे. स्वतःला वाचवण्या-साठी त्याला दाजीला उघडा करावाच लागेल. आणि कोर्टाने ठपका

ठेवला की, दाजी सत्ताहीन होईल. त्याचं संरक्षण संपेल. मग त्याला गर्जेन खून खटल्यात खेचायला वेळ नाही लागणार मला.

बाबी : ( थंडपणे निक्षून ) असं काहीएक होणार नाही. बाप्पाजी, सायबा स्वतः खडी फोडायला जाईल, वेळ प्रसंगी जीव सुद्धा देईल. पण दाजोसाहेबांना संकटात टाकणार नाही.

बाप्पाजी : असल्या खुनी, भ्रष्ट बापाबद्दल एवढं प्रेम आहे सायबाला ?

बाबी : का असू नये ? बाप्पाजी, सायबाला जसं बापानं खून केल्याचं माहीत आहे, तसंच, हाच आपला बाप छातीवर गोळ्या झेलत, लाठ्या खात, तुरुंगात खडी फोडत स्वातंत्र्यासाठी लढला होता, हेही माहीत आहे. सायबाला जसं कॉलेज फंडातील अफरातफरींची माहिती आहे, तसंच आपल्या चार यत्ता शिकलेल्या बापाने असंख्य शाळा-कॉलेजे उभी केल्याचीही माहिती आहे. राजकारणासाठी शुगर फॅक्टरीत पैसे खाल्ले हे माहीत आहे, तसंच ओसाड माळरानं बापानंच फुलवली हेही माहितीय.

बाप्पाजी : बाबे, माणसाचं आयुष्य म्हणजे काही जमाखर्चाची वही नाही. चार सत्कृत्यं जमा केलो, आता दहा दुष्कृत्ये खर्ची टाका. प्रत्येक दुष्कृत्याला, गुन्ह्याला शिक्षा ही झालीच पाहिजे.

बाबी : शिक्षा ? अखेर माणसं माणसांना फक्त शिक्षाच करू शकतात ? न्याय नाही देऊ शकत ? आणि न्यायाची गरज तर सगळ्यांनाच...भिक्याला ...सायबाला....अगदी दाजीसाहेबांनासुद्धा.

[ इतक्यात बेल वाजते...बाबी दरवाजा उघडते....दरवाजात प्रिन्सिपल जाधवराव उभा आहे. त्याला पाहताच बाप्पाजींच्या कपाळावर आठ्या चढतात. ]

बाप्पाजी : जाधवराव, तुम्ही ? इतक्या निर्लज्जपणानं माझ्या दाराशी येऊ शकता ?

जाधवराव : ( थंडपणे ) बाप्पाजी....अखेर प्रत्येकाला कोणाच्या ना कोणाच्या तरी दारी उभं राहावंच लागतं. दाजीसाहेबांनी तुम्हा दोघांना बंगल्यावर बोलावलंय.

बाप्पाजी : दाजीला सांगा, उद्या सकाळी तो साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभा राहणाराय माझ्यासमोर, आणि विरुद्ध पक्षाच्या साक्षीदाराच्या घरी जाणं वकिली नीतीत बसत नाही.

जाधवराव : ठीकय. मी बाबीताईंना घेऊन जातो. तुम्ही डायरेक्ट स्मशानात या...

बाप्पाजी : स्मशानात ?

जाधवराव : हो, स्मशानात. पोस्ट मॉर्टेम झालं, बॉडी मत्राशीच ताब्यात मिळालीय.

बाप्पाजी : कोणाची ?

जाधवराव : बाप्पाजी...फास तुम्ही गुन्हेगाराभोवती आवळला...जीव निष्पाप माणसाचा गेला. साहेबरावांनी आज सकाळी गाडीखाली जीव दिला. उद्या पेपरमध्ये अपघाती निधन असं छापून येईल.

बाबी : ( किंचाळते ) सायबा !

[ बाप्पाजी निश्चल उभा राहतो...नि.. अंधार. ]

प्रवेशान्त

♠ ♠

## अंक तिसरा : प्रवेश तिसरा

[ हळूहळू प्रकाश, कोर्टरूम दिसू लागते. शिरस्तेदाराची आरोळी. नि जड पावलांनी चालत दाजीसाहेब साक्षीदाराच्या पिंजऱ्यापाशी येतो. समोर बाप्पाजी उभा आहे. दाजीसाहेब साक्षीदाराच्या पिंजऱ्यात प्रवेश करणार तोच एक इन्स्पेक्टर ' अर्जन्ट मेसेज आहे सर ' असे म्हणून एक कागद दाजीसाहेबांच्या हातात देतो. दाजीसाहेब कागदावर एक नजर टाकतो आणि आणखीनच जड पावलांनी, खोट्या आत्मविश्वासाने, उसन्या अवसानाने पिंजऱ्यात येऊन उभा राहतो. ]

जज : मिस्टर सी. एम...आपली आजची मनःस्थिती पाहता...आपली साक्ष मी लांबणीवर टाकू शकतो.

दाजीसाहेब : त्याची काही गरज नाही...राज्यकर्त्याला फक्त कर्तव्यं असतात. भावना नाहीत. आपण आजच माझी साक्ष नोंदवू शकता.

[ शिरस्तेदार पुढे होतो...नि गीता समोर धरून म्हणतो. ]

शिरस्तेदार : शपथपूर्वक खरं तेच सांगेन...खोटं सांगणार नाही.

[ दाजीसाहेब गीतेवर हात ठेवतो आणि म्हणतो ]

दाजीसाहेब : शपथपूर्वक खोटं सांगणार नाही.

बाप्पाजी : दाजीसाहेब, शपथपूर्वक खरं सांगेन, खोटं सांगणार नाही अशी शपथ

घेतली पाहिजे.

दाजीसाहेब : खरं बोलण्याची शपथ मी घेऊ शकत नाही.

बाप्पाजी : का ?

दाजीसाहेब : कारण, गुप्ततेची शपथ घेण्याच्या बोलीवरच या देशात राज्यकर्त्यांचा शपथविधी होतो...आणि मी ती शपथ घेतलीय...खरं कधीच बोलणार नाही...जे सत्य माहिती आहे ते गुप्त ठेवीन...

जज्ज : ( हसून ) दाजीसाहेब, कोर्टापुढं खरं बोलणं हा गुन्हा नाही.

दाजीसाहेब : कोर्टापुढं खोटं बोलणं, हा तर गुन्हा आहे ना ? मी खोटं बोललो तर माझ्याविरुद्ध आपण कारवाई करू शकता...

जज्ज : ( नाइलाजाने ) प्रोसीड...!

बाप्पाजी : दाजीसाहेब, आरोपीला आपण ओळखता ?

[ आरोपीच्या पिंजऱ्यातील भिक्या एकदम हात जोडून दीनवाणेपणे उभा राहतो...दाजीसाहेब त्याच्याकडे एकटक पाहात बोलू लागतो. ]

दाजीसाहेब : होय. मी याला ओळखतो.

[ भिक्या थरथर कापायला लागतो. ]

बाप्पाजी : कोण हा ?

दाजीसाहेब : ( भान हरपत ) हा ? हा एक सामान्य माणूस आहे. बावरलेला... घाबरलेला...अगतिक ..लाचार. माझ्यासारखाच हाही एक सामान्य माणूस.

बाप्पाजी : दाजीसाहेब, हा जो कोण तो सामान्य माणूस आहे, यालाच तुम्ही व जाधवरावांनी १३ सप्टेंबरच्या रात्री...रक्ताने माखलेला सुरा हातात घेऊन...टाऊन हॉलकडून धावताना पाहिलं.

[ भिक्या आणखीनच दीनवाणा होतो. ]

दाजीसाहेब : नक्की सांगता येत नाही...याला तुम्ही संशयाचा फायदा देऊ शकता.

जज्ज : मिस्टर सी. एम. संशयाचा फायदा द्यायचा की नाही ते कोर्ट ठरवील. तुम्हाला हा चेहरा ओळखीचा वाटतो का, एवढंच सांगा.

दाजीसाहेब : ओळखीचा ? ( घाम पुसत ) सांगता येणार नाही...माणसांचेच काय, स्वतःचाही चेहरा मी हरवून बसलो आहे...रोज सकाळी आरशासमोर

डोक्यावरल्या टोपीचा कोन नीट करताना माझा चेहरा तेवढा बदललेला असतो. ( टोपीनेच चेहरा पुसतो. )

जज्ज : ( त्रासून ) मिस्टर सी. एम.... प्रश्नाचं उत्तर मोजक्या आणि नेमक्या शब्दांत द्या...

दाजीसाहेब : मोजक्या आणि नेमक्या शब्दांत ? कसं शक्य आहे ? प्रश्न इतके असंख्य, उत्तरं एवढी अगणित. खरं काय, खोटं काय तेच मला कळेनासं झालंय.

जज्ज : ( आवाज चढवीत ) मिस्टर सी. एम. विचारपूर्वक उत्तरं द्या...आपण कोर्टामध्ये साक्षीदार म्हणून उभे आहात.

दाजीसाहेब : ( भानावर येत ) अरे हो. विसरलोच मी. मी कोर्टात उभा आहे. माणसांच्या कोर्टात...( शांत होत ) मला क्षणभर वाटलं मीच आरोपीच्या पिंजऱ्यात उभा आहे. विचारा...

बाप्पा : दाजीसाहेब, आरोपीची निश्चित ओळख आपणास नाही...पण यांची ओळख तर असेल ना ? ( एक फोटो दाखवतो. )

दाजीसाहेब : ( त्याकडे पाहून न पाहिल्यासारखे करीत ) नाही ओळखत. या इसमाला मी कधीही भेटलो नाही. कुठंही पाहिलेलं नाही.

बाप्पाजी : असं कसं शक्य आहे दाजीसाहेब ? यांना आपण कागदाचा कोटा मिळवून दिला होतात, सरकारी जाहिराती दिल्या होत्यात....हे गर्जनाचे संपादक !

दाजीसाहेब : ( पिसाटत ) आम्ही राजकारणी, माणसांच्या उपयोगी पडतो ते माणूस म्हणून नव्हे तर, माणसांनी आमच्या उपयोगी पडावं म्हणून. आणि जो माणूस आमच्या उपयोगी पडत नाही...त्याचं नावच काय, चेहराही आम्ही विसरून जातो.

बाप्पाजी : ठीक आहे ! ( दुसरा फोटो दाखवत ) यांना ओळखता ? या कधी आपल्या उपयोगी पडल्या होत्या ?

दाजीसाहेब : ( फोटो हाती घेत, कासावीस होत ) हो...ओळखतो. ही सुमी. माझ्या साहेबाच्या शाळेतली. बाबीच्या वर्गातली. माझ्याच अंगणा-परसात खेळलेली, वाढलेली. मोठी लाघवी आणि प्रेमळ मुलगी. मी जेव्हा, प्रथम जिंकून घरी आलो...गुलालाने माखलेला, घामाने थबथबलेला, तेव्हा सुमी अंगणात खेळत होती. मला पाहताच ती किंचाळली नि धावत येऊन माझ्या कमरेला मिठी मारून रडू लागली. 'दाजीसाहेब, किती रक्त येतंय, लोकांनी तुम्हाला कशासाठी मारलं...?' तिला मी उचलून घेतलं....आणि घाम पुसत म्हणालो... 'खुळे, लोकांनी मला मारलं नाही ग, निवडून दिलं...रक्त नाही, हा गुलाल आहे !' पण, खुळा मीच होतो. तिचेच बोबडे बोल खरे होते. मी जखमी झालो होतो.... जन्माचा जायबंदी झालो होतो.

बाप्पाजी : दाजीसाहेब, आरोपीकडून जप्त केलेलं हे लॉकेट सुमाताईचंच काय ?

दाजीसाहेब : ( लॉकेट हातात घेतात. डोळे पाणावतात. ) नाही...हे बबडीचं. माझ्या नातीचं. बारशाच्या वेळी मीच घातलं होतं तिच्या गळ्यात. तिच्या बापानं मात्र माझी कुचेष्टा केली. म्हणे, मी चाचा नेहरूंची नक्कल करतो

बाप्पाजी : तुमच्या या गोड नातीला मारणारा हाच आरोपी आहे का ?

दाजीसाहेब : एकदा सांगितलं ना निश्चित आठवत नाही.

बाप्पाजी : नीट आठवून पाहा. दाजीसाहेब, या तीन खुनांआधीही ह्या जिल्ह्यात असे चार खून झाले आहेत. त्यातले आरोपी संशयाचा फायदा घेऊन सुटले...नि खरे गुन्हेगार कधीच सापडले नाहीत.

[ दाजीसाहेब थोडा लटपटतो. त्याच्या हातापायांना कंप सुटतो. ]

जज्ज : दाजीसाहेब, आपण बसून बोलू शकता.

[ शिरस्तेदार खुर्ची घेऊन पुढे येतो. ]

दाजीसाहेब : ( चवताळून ओरडतो ) नकोय...नकोय ती खुर्ची मला ..साली जन्मात एकदाच भेटली नि पुन्हा कधी माझ्या पायावर मला तिनं कधी उभं राहूच दिलं नाही. माणसासारखा माणूस असून चार पायाचं श्वापद बनविलं हिनं मला ..बाप असून पोराचा बळी घ्यायला लावला हिनं मला...स्वतःसाठी निष्पापांचे जीव घ्यायला लावले हिनं मला...

जाधवराव : ( मध्येच घाबरून ) दाजीसाहेब, दाजीसाहेब . भानावर या . काय बोलताय काय तुम्ही...? तुम्ही सी. एम. आहात...मुख्यमंत्री आहात.

दाजीसाहेब : होतो ..जाधवराव, आत्ता नाही...सत्ताधीशाला हृदयच असून चालत नाही, हे माहीत नव्हतं मला ...वेड्यासारखा पोरासाठी एक रात्र आसवं ढाळत बसलो...नि दगाफटका झाला. माणसं फुटली.

[ खिशातून मेसेज काढून देतो ..जाधवराव डोळे फाडफाडून वाचायला लागतो...]

जाधवराव : खाल्ल्या अन्नाशी हराम झाली ? आपली म्हणवणारी विश्वासाची माणसं फुटली ?

दाजीसाहेब : हो जाधवराव, माणसं फुटत चाललीयत. माणसं तुटत चाललीयत... सोन्याची द्वारका पाण्यात बुडत आहे ... सोन्याची द्वारका पाण्यात

बुडती आहे...

[ शांतपणे पण मोडून पडलेल्या, हरलेल्या चेहऱ्याने दाजीसाहेब साक्षीदाराच्या पिंजऱ्यातून बाहेर पडतात नि आरोपीच्या पिंजऱ्याकडे चालू लागतात...]

जाधवराव : दाजीसाहेब, आता आम्हाला कोण वाली ? आमचं आता काय होणार ? दाजीसाहेब, काय होणार ?

[ दाजीसाहेब आरोपीच्या पिंजऱ्यापाशी येताच भिक्या बावरून बाहेर पडतो...दाजीसाहेब पिंजऱ्यात उभे राहून. ]

दाजीसाहेब : ( हात वर करत ) ठोका...ठोका बेड्या...मी गुन्हेगार आहे...अखेर जे इतिहास घडवायला जातात ते इतिहासाचे गुन्हेगारच ठरतात.

[ हळू हळू अंधार होतो...पडदा सरकतो. ]

समाप्त

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ...
...क्र. 20५६२ नों. दि.
वि. नाटक ... क्र. २९/१०/८२

IRBK-0120562

IRBK-0120562